cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३१७ | रविवार दि.१५ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### इराणची भुमिका भारताला दिलासा देणारी...

अमेरिका, इस्त्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्ध दिवसेंदिवस चिघळत चाललेले दिसते. त्यामुळे तेल वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या होर्मुझ सामुद्रधुनीतील जल वाहतूक ठप्प झाली आहे. परिणामी पेट्रोल, डिझेल आणि गॅसची पुरती नाकाबंदी झाल्याचे चित्र आहे. किंबहुना, अशा स्थितीतही हार्मुझ सामुद्रधुनीतून जाण्यास भारतीय जहाजांना हिरवा झेंडा मिळणे, ही दिलासादायक बाब ठरावी.

## थोडक्यात...

### बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्याक बनवले जातेय

कोलकाताः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमध्येच ममता सरकारवर थेट निशाणा साधला. कोलकात्यातील परिवर्तन संकल्प यात्रा सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवले जात आहे. आता या निर्मम सरकारचा अंत निश्चित असून बंगालमधून महाजंगलराजचा खात्मा निश्चित आहे. तृणमूल काँग्रेसने सभेला येणाऱ्या नागरिकांना चोर म्हणून संबोधल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले, खरे चोर कोण आहेत हे बंगालची सुजाण जनता ओळखून आहे. आपली सत्ता जात असल्याचे पाहून येथील सरकार सैरभैर झाले आहे. ते केंद्र सरकारच्या योजनांमध्ये अडथळे आणत आहेत. या योजनांसाठी राज्याला एक पैसाही द्यायचा नाही, तरीही केंद्राच्या योजनांचा लाभ बंगालमधील जनतेला मिळू नये, असे इथल्या सरकारला वाटते. असा आरोप त्यांनी केला.

### तामिळनाडूत वीज दरात सवलत

चेन्नईः व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचा तुटवडा लक्षात घेता, तामिळनाडू सरकारने हॉटेल, रेस्टॉरंट आणि चहाच्या टपऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. व्यावसायिक सिलिंडरऐवजी इलेक्ट्रिक स्टोव्ह (इंडक्शन) वापरणाऱ्या व्यावसायिकांना वीज दरात प्रति युनिट २ रुपये सबसिडी देण्याची घोषणा शनिवारी करण्यात आली. पश्चिम आशियातील संघर्षामुळे २८ फेब्रुवारीपासून व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. या पार्श्वभूमीवर तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन आढावा बैठका घेतली. शनिवारी झालेल्या बैठकीत, इंडक्शन स्टोव्ह वापरणाऱ्या हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या आणि क्लाउड किचनसाठी वाढीव वीज वापरावर ही सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. अतिरिक्त मुख्य सचिव जे. राधाकृष्णन यांनी माहिती दिली की, व्यावसायिक एलपीजी वापरावरील निर्बंध कायम असेपर्यंत ही सबसिडी सुरू राहणार आहे, असे वृत्त पीटीआयने दिले आहे.

# एप्रिल महिन्यासाठी २६ टक्के अधिकचा खतसाठा; केंद्र सरकारचा लोकसभेत दावा

दिल्ली । प्रतिनिधी

**पश्चिम आशियातील युद्धामुळे खतांच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत खताच्या साठ्याची माहिती दिली. एप्रिल महिन्यासाठी देशात १६३ लाख टन खतांचा साठा उपलब्ध आहे. मागील वर्षी याच कालावधीत खतांचा साठा १२८.५४ लाख टन होता. या वर्षी मात्र मागील वर्षीच्या तुलनेत २६ टक्के अधिकचा साठा असल्याचा दावा केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांनी केला आहे.**



लोकसभेत बोलताना अर्थमंत्र्यांनी सांगितले की, ''भारतात खतांची गरज भागवण्यासाठी आयातीबरोबरच देशांतर्गत युरिया उत्पादनही वाढवले जात आहे. २०१४–१५ मध्ये देशातील युरिया उत्पादन २२५ लाख टन होते, ते २०२४–२५ मध्ये वाढून ३०६.६७ लाख मेट्रिक टन झाले आहे.'' असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी अर्थमंत्र्यांनी देशातील खत उत्पादन वाढीसाठी केंद्र सरकारचे प्रयत्न सुरु असल्याचे सांगितले. ''युरिया उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन गुंतवणूक धोरणांतर्गत ६ खत उत्पादन प्रकल्प सुरू केले आहेत. या प्रत्येक प्रकल्पाची सरासरी उत्पादन क्षमता दरवर्षी १२.७ लाख टन आहे. या सर्व प्रकल्पांमुळे देशाच्या युरिया उत्पादन क्षमतेत

▶▶ पान २ वर

# एलपीजी घेवून दोन भारतीय जहाज स्वदेशात

## ९२,७०० टन गॅस घेऊन गुजरातच्या बंदरांकडे रवाना

दिल्ली । वृत्तसंस्था

खाडी देशांतून एलपीजी वाहून आणणारी दोन भारतीय जहाजे, 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' हे शनिवारी पहाटे कोणत्याही अडथळ्याशिवाय होर्मुझ सामुद्रधुनी यशस्वीरीत्या पार करून गुजरातच्या मुंद्रा आणि कांडला बंदरांच्या दिशेने निघाली आहेत. शिपिंग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी ही माहिती माध्यमांना दिली.

▶▶ पान २ वर



# राज्यात कुठेही गॅसची टंचाई नाही मुख्यमंत्री फडणवीसांनी केले स्पष्ट

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात कुठेही गॅसची टंचाई नाही. काँग्रेस पक्ष जाणीवपूर्वक लोकांमध्ये भीती निर्माण करुन त्यांनी रांगा लावाव्या यासाठी प्रयत्न करत आहेत, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्र सरकार आणि गॅस कंपन्यांनी स्पष्ट केले आहे की, घरगुती गॅस पुरवठ्याचे कोणतेही संकट नाही. महिन्याला जितका गॅस लागतो, तितका गॅस पुरवला जात आहे. त्यामुळे कोणीही चिंता करु नये. लोकांनी विनाकारण रांगा लावू नये. ऑनलाईन गॅस बुकिंग सुरु आहे. नागरीकांना वेळेत गॅस देण्यासाठी सिलिंडर उपलब्ध आहेत पण, देशात पॅनिक निर्माण करण्याची काँग्रेसची बुद्धी देशासाठी विघातक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच, यावरती तोडगा काढण्यासाठी राज्य

▶▶ पान २ वर

# यूएईमधील रहिवाशांना बंदरे आणि अमेरिकन लष्करी तळ सोडण्याचे आवाहन

तेहरान । वृत्तसंस्था

इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने युनायटेड अरब अमिरातीला गंभीर इशारा दिला आहे. इराणच्या खर्ग बेटावर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील तणाव कमालीचा वाढला असून, इराणने आता युएईमधील अमेरिकन ठिकाणांना लक्ष्य करण्याचा इशारा दिला आहे.

इराणच्या लष्करी मध्यवर्ती कमांडने (खातम अल–अंबिया) सरकारी टीव्हीवरून प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, इराणवर होणारे हल्ले थांबले नाहीत, तर युएईमधील

▶▶ पान २ वर

# प्रथम अजितदादा विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज द्या–अमोल मिटकरी

पुणे । प्रतिनिधी

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा दिवंगत अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूविषयी संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या यंत्रणांनी आपला अहवाल पुढच्या वर्षी द्यावा, पण प्रथम अजित पवार विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज देण्याची मागणी मिटकरी यांनी केली आहे. अजित पवार यांचा गत २८ जानेवारी रोजी बारामतीत झालेल्या एका विमानात अपघातात

▶▶ पान २ वर






cmyk

## अग्रलेख

# इराणची भुमिका भारताला दिलासा देणारी...

अमेरिका, इस्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्ध दिवसेंदिवस चिघळत चाललेले दिसते. त्यामुळे तेल वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या होर्मुझ सामुद्रधुनीतील जल वाहतूक ठप्प झाली आहे. परिणामी पेट्रोल, डिझेल आणि गॅसची पुरती नाकाबंदी झाल्याचे चित्र आहे. किंबहुना, अशा स्थितीतही हार्मुझ सामुद्रधुनीतून जाण्यास भारतीय जहाजांना हिरवा झेंडा मिळणे, ही दिलासादायक बाब ठरावी. खरे तर इराण आणि भारताचे मैत्र जुने आहे. इराण हा देश कधीच भारतविरोधी म्हणून गणला गेला नाही. अगदी शतकानुशतकापासून दोन देशांमध्ये सांस्कृतिक, आर्थिक आणि राजनैतिक संबंध आहेत. प्राचीन पर्शियन साम्राज्य आणि भारतीय उपखंड यांच्यामध्ये व्यापार आणि सांस्कृतिक देवाणघेवाण होत असे. पारसी भाषा अनेक शतकांपर्यंत भारतातील दरबारी भाषा असल्याचे सांगितले जाते. स्वातंत्र्यानंतर दोन्ही देशांनी राजनैतिक संबंध अधिक दृढ केले. ऊर्जा क्षेत्र, बंदरे, व्यापार आणि मध्य आशियाशी संपर्क यामध्ये सहकार्य वाढले. इराण हा कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा महत्त्वाचा पुरवठादार देश. कोणत्याही व्यापारामध्ये व्यवहार महत्त्वाचा असतो. पण, इराणने व्यवहाराइतकेच आपापसांतील संबंधांना आणि मैत्रीला महत्त्व दिल्याचे इतिहास सांगतो.

अडचणीच्या काळात इराणने भारताला उधारीवर तेल दिले, तेही बिनव्याजी स्वरुपात, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. काश्मीरच्या मुद्द्यावरही इराणने नेहमीच भारताची पाठराखण केली. अनेक मुस्लिम देश पाकिस्तानकडे झुकलेले असताना इराण भारताच्या बाजूने उभा राहिल्याचे आपण पाहिले. १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्रात पाकिस्तानने आणलेला ठराव इराणने रोखला. काश्मीर हा भारताचा अंतर्गत प्रश्न आहे. तो द्विपक्षीय चर्चेतून सुटावा, अशी स्पष्ट भूमिका इराणने तेव्हा घेतल्याचे दिसून येते. भारतानेही इराणसोबत अनेक मोठे प्रकल्प हाती घेतले. त्यामध्ये चाबहार या बंदराच्या विकासाचा प्रकल्प विशेष महत्त्वाचा. या प्रकल्पामुळे भारताला पाकिस्तानला वळसा घालून अफगाणिस्तान आणि मध्य आशियाशी थेट व्यापार करता येतो. इराण–पाकिस्तान–भारत हा गॅस पाइपलाईन प्रकल्प प्रत्यक्षात आला नसेलही. परंतु, हा प्रकल्पही दोन देशांतील मैत्रीच अधेरेखित करतो. इराणमधील प्रचंड नैसर्गिक वायू साठ्याचा उपयोग करण्यासाठी २००० च्या दशकात इराण–पाकिस्तान–भारत गॅस पाइपलाईनची संकल्पना मांडण्यात आली. या प्रकल्पास 'पीस पाइपलाईन' म्हणूनही संबोधले गेले. त्यानुसार ही गॅस पाइपलाईन इराणमधील साऊथ पार्स गॅस क्षेत्रातून सुरू होऊन पाकिस्तानमधून भारतात येणार होती. भारताला स्वस्त नैसर्गिक वायू मिळेल आणि ऊर्जा सुरक्षेला मोठा आधार मिळेल, अशी अपेक्षा होती. त्या काळात डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारने या प्रकल्पाबाबत गंभीर चर्चा केल्याचे दिसून आले. परंतु, नंतरच्या काळात हा प्रकल्प बारगळला. इराणच्या अणुकार्यक्रमामुळे अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांनी इराणवर कठोर आर्थिक निर्बंध लादले. अशा परिस्थितीत इराणसोबत मोठा ऊर्जा प्रकल्प राबवल्यास भारतावरही निर्बंध येऊ शकतात, अशी भीती होती. मुळात अमेरिकेने या प्रकल्पाला तीव्र विरोध केला होता. त्यामुळे भारताने माघार घेतली आणि एका चांगल्या प्रकल्पाला ब्रेक बसला. हा पाइपलाईन प्रकल्प पाकिस्तानमधून जाणार होता. भारत आणि पाकिस्तानमधील तणावपूर्ण संबंध लक्षात घेता पाइपलाईनची सुरक्षा हादेखील मोठा प्र होता. संघर्ष झाल्यास पुरवठा बंद होण्याची शक्यता होती. त्यामुळे दोन देशांतील तणावाचा या प्रकल्पाला फटका बसला. गॅसच्या किंमतीबाबत इराण आणि भारत यांच्यामध्ये काहीसे मतभेद असल्याचेही सांगितले जाते. भारताला स्वस्त दरात गॅस हवा होता, तर इराण अधिक दराची मागणी करत होता. असे असले, तरी हे मतभेद मिटू शकले असते. परंतु, यापेक्षा अमेरिका आणि पाकिस्तान या मोठ्या अडचणी होत्या. त्यामुळे हा प्रकल्प प्रत्यक्षात येऊ शकला नाही. या काळात भारताने द्रवरूप नैसर्गिक वायू एलएनजी आयात करण्यास सुरुवात केली. त्यामुळे पाइपलाईन प्रकल्पावरील अवलंबित्व कमी झाले. मध्यपूर्वेतील अस्थिरता, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि निर्बंध यामुळे हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या आणि राजकीयदृष्ट्या अवघड बनला, हीदेखील त्याची एक बाजू सांगण्यात येते. इराण–भारत गॅस पाइपलाईन प्रकल्प अमेरिकेचे निर्बंध, पाकिस्तानमार्गे सुरक्षा प्र, दर वा किंमत तसेच राजकीय मतभेद यामुळे साकारला नसला, तरी भारत–इराण मैत्रीला त्यातून नवा आयाम मिळाला, हे नाकारता येणार नाही. आता युद्ध काळातही दोन भारतीय जहाजांना परवानगी देऊन इराणने आपला भारताबद्दलचा सॉफ्ट कॉर्नर पुन्हा एकदा दाखवून दिला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून २० टक्के वाहतूक होते. तथापि, येथून होणारी वाहतूक ठप्प झाल्याने भारतासमोरही मोठ्या अडचणी निर्माण झाल्या होत्या. रशिया वा इतर देशांतून तेल वाहतूक सुरू असली, तरी केवळ त्याने भागणार नव्हते. अशा कठीण काळात जहाजातून १० लाख पिंप कच्चे तेल सौदीतून आणि २० लाख पिंप कच्चे तेल इराकमधून मुंबईत दाखल होणे, ही सर्वसाधारण घटना नाही. याशिवाय पुष्पक आणि परिमल ही अन्य दोन जहाजेदेखील भारताच्या दिशेने येत आहेत. या सामुद्रधुनीतील वाहतूक पूर्ववत झाल्यास आणखी जहाजे भारताच्या दिशेने येऊ शकतील, असे उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. मागच्या काही दिवसांपासून परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांच्यात तीन वेळा संवाद झाला आहे. या दोघांमध्ये जहाजांची सुरक्षा आणि भारताच्या ऊर्जा सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा झाल्याचे समजते. हे पाहता भारत व इराण यांच्यातील पूर्वापार मैत्री आपल्यासाठी दिलासादायक ठरल्याचे दिसते. होर्मुझच्या सामुद्रधुनीवर जगाचे अर्थकारण अवलंबून आहे. त्यामुळे ती बंद ठेऊन अमेरिकेवर दबाव टाकण्याची इराणची रणनीती दिसते. युद्धामध्ये नेहमीच वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब होत असतो. अमेरिका, इस्रायलसारख्या शक्तिशाली राष्ट्रांशी लढण्यासाठी त्यातूनच इराणने प्रामुख्याने होर्मुझवर लक्ष्य केंद्रित केल्याचे दिसते. त्यामुळे तेल वाहतूक इतक्यात सुरळीत होण्याची चिन्हे नाहीत. हे पाहता सामरिक आणि रणनीतिक पातळीवर भारताचा कस लागेल. स्वाभाविकच मुत्सद्देगिरीची लढाईही येथून पुढे महत्त्वाची असेल.

# नवविधा भक्ती आणि उपासनेतून शाश्वत समाधान मिळते-प्रज्ञा वर्तक

**बीड । प्रतिनिधी**

नवविधा भक्ती आणि उपासनेतून शाश्वत समाधान मिळत असते आणि त्यासाठी अभ्यासातून प्रगटणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन पूर्णवाद अभ्यासक सौ.प्रज्ञा वर्तक यांनी केले.

येथील संत भगवान बाबा प्रतिष्ठान परिसरातील पिंगळे निवासस्थानी असलेल्या 'ॐ विष्णवे नमः मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजीत तीन दिवसीय कार्यक्रमात पहिल्या दिवसाचे पूर्णवादावरील पुष्प गुंफताना त्यांनी उपासना मार्गाची माहिती दिली. डॉ. रामचंद्र पारनेरकर महाराज यांनी अनेक तत्त्वांचा अभ्यास केला. जीवन जगण्याऐवजी शाश्वत काय आहे याचा अभ्यास त्यांनी केला. त्यांना त्यावेळेस लक्षात आले की मृत्यू हा शाश्वत आहे, त्यामुळे जीवन जगण्यासोबतच ऐच्छिक जीवन लाभ आणि मरण भय मुक्ती हा महत्त्वाचा सिद्धांत त्यांनी मांडला. नवविधा भक्तीतून शाश्वत समाधान मिळते असे ते म्हणतात. जप, तप, ताप, दैन्य या सर्वांतून जावे लागते. समर्थ रामदास स्वामी म्हणतात, '. ऐच्छिक जीवन लाभ आणि मरण भय मुक्ती ही पूर्णवादाची फलश्रुती आहे. हाती काम ज्याच्या मुखे नाम राम आहे, ही गुरु आणि त्यांची शिष्य परंपरा मोठी आहे. त्यासाठी सत्य शिष्यग्रंथाचा अभ्यास करावा लागेल, हे सर्व शिष्य उपासना मार्गाने मोठे झाले. आपल्या सानिध्यात गुरूंनी त्यांच्या शिष्यांनाही मोठी केली. उपासना हे साधन सांसारिकासाठी आहे, त्यातून पूर्ण पुरुषाचे दर्शन होते. आपल्याला फक्त अभ्यास करून ते आचरणात आणायचे आहे. उपासनेसाठी त्यांनी स्वतःचे काही अनुभव सांगितले. मनातले भाव जर गुरुपाशी व्यक्त केले तर गुरु ते पूर्ण करतात, असा त्यांनी नरसिंहवाडीचा अनुभव सांगितला. नरसिंहवाडीला लक्ष्मीकांत दादांचे दर्शन घडल्याचे त्यांनी सांगितले. आपण जे जे काही करतो ते परमेश्वर चरणी अर्पित केले पाहिजे, त्यातूनच प्रचितीचा परमार्थ साधतो. उपासना करताना त्या वेगवेगळ्या पायऱ्या आहेत त्या लक्षात ठेवाव्या लागतात, त्या प्रत्येक टप्प्यावर परिपक्वता येत असते आणि गुरुच्या दर्शनाची अनुभूती मिळत असते. नरसिंहवाडीला पूर्ण पुरुषाचे दर्शन त्यांना घडले. प्रत्येकालाच वेगवेगळे आराध्य दैवत उपासनेला सांगितले आहे आणि त्या वेगवेगळ्या मार्गांनी शिष्यांना त्यांनी वेगवेगळ्या उपास्य रूपांमध्ये दर्शन घडविले. हे उपासनेने शक्य होते . प्रारंभी जगदीश पिंगळे यांनी अभंग गायन केले, तर प्रास्ताविकात सौ. सुमती पिंगळे यांनी या महोत्सवातील कार्यक्रमाचा आढावा घेतला आणि प्रवचनकर्त्या सौ. प्रज्ञा वर्तक यांचा परिचय करून दिला. यानंतर दीपप्रज्वलन होऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली. सौ. आनंदी महाजन आणि सौ. ज्योती शेटे यांनी सौ. प्रज्ञा वर्तक यांचा साडी-चोळी देऊन सत्कार केला. या कार्यक्रमाचे आभार अशोककाका महाजन यांनी मानले. सौ.आनंदी महाजन मुरलीधर देशपांडे, दिगंबरराव कुंडलकर, अरुण कुंडलकर, सौ. सुनंदा कुंडलकर, सौ. आशाताई हिंदोळे, सौ. कस्तुरीताई गायकवाड, सौ. प्रतिभा पाटील यांसह अनेक जण उपस्थित होते.



जालना येथे कौटुंबिक न्यायालयात पती पत्नीची तडजोड करून एकत्र नांदण्यास पाठविण्यात आले,यावेळी न्या.अदिती नागोरी मॅडम,अध्यक्ष ॲड. परमेश्वर गडगीळे,ॲड.राहुल चव्हाण,सचिव ॲड.विनोद कुलकर्णी,उपाध्यक्ष अशोक वाहूळकर,सहसचिव शिवनाथ जऱ्हाड.

# बीड जिल्हा परिषदेमध्ये सुनावणीच्या नावाखाली हातुरमातूर चौकशी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीच्या कामात प्रचंड अशा प्रकारचा भ्रष्टाचार झाल्याची प्रकरणे रोज रोज नव्याने उघडकीस येत आहेत गावातील अनेक कामांच्या तक्रारी केल्यानंतर त्याची चौकशी ही बीड जिल्हा परिषदेमध्ये घेतली जाते आज गुरुवारी सकाळ पासूनच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान यांच्या दालनासमोर सुनावणीसाठी मोठ्या प्रमाणात लोकांना चौकशीसाठी बोलावण्यात आले होते जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रत्येक बाब तपासून घेणे गरजेचे असताना ज्यांनी तक्रार केली त्यांचीच उलट तपासणी करून ज्यांच्या विषयी तक्रार आहे त्या पंचायत समितीतील अधिकारी ग्रामसेवक विस्तार अधिकारी किंवा चौकशी समितीतील लोकांना पाठीशी घालण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी केले अनेक सुनावणीत महिलांचा कारभार हे पुरुष करत असल्याच्या तक्रारी होत्या त्याचप्रमाणे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी असताना सुद्धा तक्रारदारालाच हे होतच असते असे म्हणत त्यांनी आपल्याच भ्रष्ट कर्मचाऱ्यांची बाजू घेतल्याचे काही तक्रारदारांनी बोलून दाखवले यातून मकरंद अनासपुरे यांच्या चित्रपटातील एका डायलॉग ची आठवण येते या डायलॉगमध्ये साहेब कायद्या चे बोला असा तो डायलॉग होता त्याचाच प्रत्येकाला बीड जिल्हा परिषदेमध्ये अनेकांना आला तक्रारीची कुठल्याही प्रकारची चौकशी न करता चौकशी पथकाने दिलेल्या अहवालावरच तो अत्यंत खरा आहे असे समजून तक्रार करणाऱ्याला हे होतच असते असे सल्लेही त्यांनी दिले मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी काल सुनावण्या घेतल्या या सुनावणीत जिल्हा परिषदेचे काही कर्मचारी आपल्या हात ओले करून घेताना दिसत असल्याच्या अनेकांच्या तक्रारी होत्या ग्रामपंचायतचे मुख्य उपमुख्य कार्यकारी अधिकारी काळे यांचे आपल्या कर्मचाऱ्यावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याचे दिसून आले. काळे यांना कुठल्याही प्रकरणाची माहिती दिल्यानंतर अगदी अर्ध्या तासाने त्यांना ती विचारली तर त्या गोष्टी लक्षात राहत नाहीत त्यामुळे ग्रामपंचायत मध्ये मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात सावळा गोंधळ निर्माण झाला आहे त्यातच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासमोर कुठलीही फाईल जाताना किंवा चौकशी करावयाचे असल्यास या चौकशीपूर्वीच तडजोड केली जाते अशा अनेकांच्या तक्रारी आहेत जिल्हा परिषद मधील सुनावणी म्हणजे पैसे कमावण्याचे एक साधन झाले आहे मात्र ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही किंवा आठवड्यात अनेक सुनावण्या घेऊन या सुनावणीतून कुठल्याही प्रकारच्या भ्रष्टाचारावर कार्यवाही होऊन लोकांना न्याय दिल्याचे दिसत नाही जतिन रहेमान यांच्या विषयी सुरुवातीला जिल्ह्यात चांगल्या प्रतिमेचा अधिकारी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली होती मात्र आपल्याच अधिकाऱ्यांचे ऐकून कुठल्याही प्रकारची कार्यवाही न करता फक्त सुनावणी आणि चौकशी या पलीकडे कुठलाही कारभार सरकत नाही गेल्या अनेक दिवसात कुठल्याही भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर कठोर कारवाई करण्यात आलेली नाही गुरुवारी झालेल्या सुनावणीत अनेकांनी गावचा कारभार महिलांच्या ऐवजी त्यांचे घरातील मंडळी सर्व कारभार चालवत आहेत अशा प्रकारच्या तक्रारी आल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यात सर्वच ग्रामपंचायत मध्ये असा कारभार चालतो हे जाहीरपणे बोलून दाखवले त्यामुळे जतिन रहमान हे शासनाचे धोरण पुढे घेऊन जात आहेत की महिला राज ला विरोध करत आहेत अशा प्रकारचा समज निर्माण होत आहे एकूणच बीड जिल्हा परिषदेमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी काळे हे कायमस्वरूपी दौरे आणि सुनावणीत व्यस्त असतात त्यांच्या काळात जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अगदी नाममात्र ही राबवले जात नाही ही शोकांतिका आहे जितिन रहमान यांनी अनेक प्रकरणात ग्रामपंचायत मध्ये भ्रष्टाचार झालेल्या वरती कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे.

# राणी उंचेगाव येथे महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात; ७२७ नागरिकांना जागेवरच लाभ

**घनसावंगी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील राणी उंचेगाव महसूल मंडळात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर(टप्पा १) अत्यंत उत्साहात आणि नागरिकांच्या प्रचंड प्रतिसादात संपन्न झाले. या शिबिराच्या माध्यमातून प्रशासकीय सेवा थेट जनतेच्या दारी पोहोचवण्यात आल्या असून, एकाच दिवशी ७२० नागरिकांना विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला.**



या शिबिराचे उद्घाटन घनसावंगी मतदारसंघाचे आमदार हिकमत उढाण आणि जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी महसूल विभागासह तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंबडचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांनी आपल्या प्रास्ताविकात या अभियानाचा मुख्य उद्देश स्पष्ट केला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी राज्य सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचे स्वरूप सविस्तरपणे मांडले तसेच नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या प्रलंबित कामांचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांचे विविध अर्ज व प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे शासनाच्या सेवा थेट गावपातळीवर उपलब्ध होत असल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. असे सांगत आमदार हिकमत उढाण यांनी प्रशासनाच्या या उपक्रमाचे कौतुक करत जनतेला सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित केले. या शिबिरात तहसीलदार रमेश पागोटे, गट विकास अधिकारी प्रदीप कदम, नायब तहसीलदार सोमनाथ तोतला, श्रीमती मोनाली सोनवणे, तालुका कृषी अधिकारी सखाराम पवळ, गट शिक्षणाधिकारी रवी जोशी, उपअधीक्षक भूमी अभिलेख श्रीमती शालिनी बिदरकर, दुय्यम निबंधक मनीषा पैठणे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र जोगड आणि विविध विभागांचे विस्तार अधिकारी, आरोग्य अधिकारी, अंगणवाडी सेविका व मंडळ अधिकारी उपस्थित होते. महसूल, कृषी, पंचायत समिती आणि आरोग्य अशा सर्वच विभागांचे स्टॉल्स या ठिकाणी लावण्यात आले होते. नागरिकांकडून अर्ज स्वीकारून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात आली. विविध दाखले, योजनांची मंजुरी पत्रे आणि इतर सेवांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या मोहिमेमुळे नागरिकांचा वेळ आणि हेलपाटे वाचल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. शेवटी गट विकास अधिकारी प्रदीप कदम यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी कृषी विभागातर्फे शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरणासाठी विविध यंत्रसामग्रीचे वाटप करण्यात आले. यामध्ये ट्रॅक्टर, हार्वेस्टर, रोटावेटर तसेच इतर कृषी उपकरणांचा समावेश होता. शिबिराचे मुख्य आकर्षण : लेक वाचवा, लेक शिकवा उपक्रम या शिबिराचे एक अत्यंत महत्त्वाचे आणि कौतुकास्पद वैशिष्ट्य म्हणजे राणी उंचेगाव ग्रामपंचायतीने राबवलेला अनोखा उपक्रम. ज्या कुटुंबांमध्ये पहिले अपत्य 'मुलगी' आहे, अशा २४ लाभार्थ्यांच्या (मुलींच्या) नावे ग्रामपंचायतीतर्फे प्रत्येकी ५ हजार रुपयांची मुदत ठेव () ती मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत करण्यात आली. यावेळी या मुलींच्या माता-पित्यांचा साडी-चोळी आणि टॉवेल-टोपी देऊन विशेष सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी ग्रामपंचायतीच्या या स्तुत्य आणि पुरोगामी पावलाचे विशेष कौतुक केले. या अभियानात एकूण ७२७ नागरिकांना विविध प्रमाणपत्रांचे व सेवांचे वाटप करण्यात आले.

## पान १ वरून...

### एप्रिल महिन्यासाठी २६ टक्के अधिकचा

७६.२ लाख टनांची वाढ झाली आहे.'' असे त्यांनी नमूद केले. तसेच २०१५ च्या नवीन युरिया धोरणांतर्गत ओडिशा आणि आसाममध्ये आणखी दोन नवीन प्रकल्पांवर काम सुरू आहे. हे प्रकल्प सुरू झाल्यानंतर देशाच्या खत उत्पादन क्षमतेत दरवर्षी २५.४ लाख टनांची वाढ होणार आहे, असा दावा त्यांनी केला. तर अनुदान पूरक मागण्यांमधून खत विभागाला अतिरिक्त निधी दिला जात असून त्याचा वापर पुढील रब्बी हंगामाच्या तयारीसाठी केला जाणार असल्याचे सांगितले. खरीप हंगामासाठीही सरकारकडे पुरेसा खत साठा उपलब्ध आहे. तसेच डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी या काळात येणाऱ्या रब्बी हंगामासाठी खत विभागाला आधीपासून तयारी करता यावी म्हणून सरकार अतिरिक्त तरतूद करत आहे. खत अनुदानासाठी सरकारने अंदाजपत्रकापेक्षा सुमारे १९ हजार कोटी रुपये अधिक खर्च केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तर सरकार केवळ गरजेनुसार युरिया आयात करत नाही, तर नवीन प्रकल्प उभारून आणि जुन्या प्रकल्पांची क्षमता वाढवून देशांतर्गत उत्पादनही वाढवत आहे, असा दावा अर्थमंत्री सीतारामन यांनी केली. दरम्यान, भारत पश्चिम आशियातील देशांकडून मोठ्या प्रमाणात खत आयात करतो. परंतु इस्त्रायल-अमेरिका आणि इराण युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक ठप्प झाली आहे. युद्ध दीर्घकाळ सुरूच राहिले, तर भारतात खतांची टंचाई निर्माण होईल, अशी शक्यता जाणकार व्यक्त करत आहेत.

---------------

### एलपीजी घेवून दोन भारतीय

सिन्हा यांनी सांगितले की, होर्मुझच्या पश्चिम भागात एकूण २४ भारतीय झेंडा असलेली जहाजे होती. त्यापैकी शिवालिक आणि नंदा देवी ही दोन एलपीजी वाहक जहाजे रात्रीच्या उत्तरार्धात किंवा पहाटे सामुद्रधुनी पार करण्यात यशस्वी झाली. ही दोन्ही जहाजे मिळून सुमारे ९२,७०० टन एलपीजी घेऊन येत असून ती अनुक्रमे १६ आणि १७ मार्च रोजी भारतीय बंदरांवर पोहोचण्याची शक्यता आहे. या दोन जहाजांनंतर आता त्या परिसरात २२ भारतीय जहाजे असून त्यावर ६११ भारतीय नाविक आहेत. फारस आखात परिसरातील सर्व भारतीय नाविक सुरक्षित असून गेल्या २४ तासांत कोणतीही अप्रिय घटना घडली नसल्याची माहिती सिन्हा यांनी दिली. याशिवाय, ओमानच्या सोहर बंदरातून गॅसोलीन घेऊन तांझानियाच्या तांगाकडे निघालेले 'जग प्रकाश' हे जहाज २१ मार्चला आपल्या गंतव्यस्थानी पोहोचण्याची अपेक्षा आहे. अमेरिका व इस्रायलच्या इराणवरील हल्ल्यांनंतर इराणने केलेल्या प्रत्युत्तरामुळे होर्मुझ सामुद्रधुनीजवळ शेकडो व्यापारी जहाजे अडकली आहेत. विदेश मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, भारतीय जहाजांना सुरक्षित आणि निर्विघ्न मार्ग मिळावा यासाठी सरकार संबंधित देशांशी सातत्याने संवाद साधत आहे. देशाची ऊर्जा सुरक्षा सर्वोच्च प्राधान्य असून त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. शिपिंग मंत्रालयाने देशातील सर्व प्रमुख बंदरे आणि राज्य सागरी मंडळांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की एलपीजी वाहक जहाजांना बर्थिंगमध्ये प्राधान्य द्यावे. घरगुती बाजारात एलपीजीची मागणी वाढल्याने पुरवठ्यावर दबाव आहे. आतापर्यंत जगाच्या विविध भागांतून आलेल्या सहा एलपीजी वाहक जहाजांना बंदरांवर प्राधान्याने बर्थ देण्यात आले असून सहा अन्य जहाजांना सुरक्षित नांगर टाकण्याची सोय करण्यात आली आहे.

------------

### प्रथम अजितदादा विमानात

मृत्यू झाला होता. तेव्हापासून हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या आमदारांनी असा दावा केला आहे. त्यात प्रामुख्याने रोहित पवार व अमोल मिटकरी यांनी या प्रकरणी सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करून तपास यंत्रणांवरील दबाव वाढवला आहे. या पार्श्वभूमीवर मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे अजित पवार यांचा अपघात नव्हे तर घातपातच असल्याचा दावा केला आहे. अमोल मिटकरी शनिवारी एका पोस्टमध्ये म्हणाले, अजितदादा विमान दुर्घटना प्रकरणात महाराष्ट्रातील जनतेला शंका असणारे कटाचे मुख्य सूत्रधार, सुमित कपूर, साहिल मदन, यश व यांचा बाप सिंग कुठाय तेही नंतर सांगा? डीजीसीएचा अंतिम अहवाल व ब्लैक बॉक्स डेटा वाटल्यास पुढच्या वर्षी द्या निदान दादा विमानात बसतानाचा सीसीटीव्ही फुटेज तर महाराष्ट्रासमोर येऊ द्या. मिटकरी यांनी हे ट्विट मुंबई पोलिस व केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयलाही टॅग केले आहे. या ट्विटमध्ये त्यांनी एक फोटोही पोस्ट केला आहे. त्यात त्यांनी अजित पवारांच्या अपघाताचा तपास करणाऱ्या सर्वच तपास संस्था अपयशी ठरल्याचा दावा केला आहे. प्रस्तुत फोटोत नमूद करण्यात आले आहे की, २८ जानेवारीनंतर या एक महिना ११ दिवसांत अजितदादांच्या अपघाताविषयी एकही ठोस पुरावा न देऊ शकलेले फेल इन्व्हेस्टिगेशन कंपनी. एफआयआर न घेऊ शकलेले फेल पोलिस. व्ही के सिंगला सपोर्ट करणारी फेल सीआयडी. आंतरराष्ट्रीय चौकशी नाकारणारे फेल सरकार. सीसीटीव्ही फुटेज नाही. ब्लॅक बॉक्स जळाला. ऑल इन्व्हेस्टिगेशन आर आर फेल हेअर. जनतेचा आवाज दाबणारे सगळे फेल. शेमफूल प्रोसेस. उल्लेखनीय बाब म्हणजे अमोल मिटकरी यांनी अजित पवारांच्या अपघातावर विधिमंडळात चर्चा करण्यात होणाऱ्या दिरंगाईवरही नाराजी व्यक्त केली आहे.

--------------

### यूएईमधील रहिवाशांना बंदरे आणि

अमेरिकन लष्करी तळ आणि तिथल्या पायाभूत सुविधांना कायदेशीर लक्ष्य मानले जाईल. आपल्या राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे आणि भूप्रदेशाचे रक्षण करण्यासाठी शत्रू राष्ट्राच्या लष्करी ठिकाणांवर प्रतिहल्ला करणे हा त्यांचा वैध अधिकार असल्याचेही इराणने म्हटले आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून इराणने युएईमध्ये राहणाऱ्या नागरिकांना आणि रहिवाशांना सतर्क केले आहे. बंदरे, धक्के आणि ज्या भागात अमेरिकन सैन्याचे तळ आहेत, अशा ठिकाणांपासून तात्काळ दूर राहावे किंवा ती ठिकाणे रिकामी करावीत, असे आवाहन इराणी लष्कराने केले आहे. अमेरिकन क्षेपणास्त्रे आणि लष्करी हालचाली असलेल्या भागांपासून सामान्य नागरिकांनी सुरक्षित अंतर ठेवावे, असे या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

--------------

### राज्यात कुठेही गॅसची टंचाई नाही

सरकारने नियमावली जारी केली आहे. रुग्णालये, शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रम, वसतिगृहे, शासकीय खानावळी, मध्यान्ह भोजन, अंगणवाडी अशा सर्व संस्थांना शंभर टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश दिलेले आहेत. तसेच, सर्व गॅस एजन्सींना दैनंदिन अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. सार्वजनिक सेवेतील संस्थांना १०० टक्के गॅस पुरवठा केला जाणार आहे. राज्यातील उपाहारगृहांना ७० टक्के, औषध उद्योगांना ५० टक्के, बीज प्रक्रियेसाठी ५० टक्के, मत्स्य पालन व्यवसायांना ५० टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रेल्वे, संरक्षण क्षेत्र, पोलीस दल, हवाई वाहतुकीला ७० टक्के गॅस पुरवठा केला जाणार आहे. दरम्यान, मध्य-पूर्वेतील परिस्थितीमुळे देशभरातील गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला असून, अनेक ठिकाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. याची झळ महाराष्ट्रालाही पोहोचली आहे. सरकारकडून गॅस पुरवठा सुरळीत असल्याचा दावा करण्यात येत असला, तरी प्रत्यक्षात अनेक भागांत ग्राहकांना वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. गॅस उपलब्ध नसल्याने नागरिकांना गॅस एजन्सीसमोर रांगेत उभे राहावे लागत आहे.

--------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. १५ मार्च २०२६


## थोडक्यात

### नायब तहसीलदार भगीरथ धारक यांना मातृशोक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धानोरा येथील रहिवासी आष्टी शहरातील विनायक नगर येथे स्थायिक असलेले आष्टी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार भगीरथ धारक यांच्या मातोश्री कौशल्याबाई चंद्रभान धारक (वय वर्षे ९०) यांचे आज शुक्रवार पहाटे निधन झाले. त्यांचा अंत्यविधी शुक्रवारी सकाळी ११ वा. धानोरा येथील अमरधामात झाला. त्यांच्या पाठीमागे बापूराव धारक,नायब तहसीलदार भगीरथ धारक, संतोष धारक, गुलाब धारक हे मुले, सुनंदा रामदास दळवी ही मुलगी आहे. अंत्यविधीस माजी आ. साहेबराव दरेकर , उपविभागीय



अधिकारी वसीमा शेख,तहसीलदार वैशाली पाटील, ॲड.हनुमंतराव थोरवे,माजी सभापती संजय ढोबळे,माजी सरपंच सतीशशेठ धस, माजी सभापती अंकुशराव चव्हाण, माजी सभापती विजयकुमार बांदल, पंचायत समिती सदस्य परमेश्वर काका शेळके, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,अनिलतात्या ढोबळे,संजय मेहेर, सुभाष राऊत, जालिंदर वांढरे, माजी सरपंच राजाभाऊ शेळके, माजी सरपंच भाऊसाहेब शेळके, मच्छिंद्र शेळके, भगवान गायकवाड, माजी सरपंच देविदास उदावंत, पीएसआय गोरख शेळके,अजिनाथ शेळके,रावसाहेब वाघमारे,पत्रकार गणेश दळवी, अविनाश कदम, रघुनाथ कर्डिले व सर्व पत्रकार बांधव, सुभाष जगताप, आप्पा बरडे, कैलास पोकळे, रावसाहेब धस, अनिल राऊत, ह.भ.प. हौसराव आजबे महाराज, अन्सार शेख इंद्रकांत शेंदूरकर, बाळासाहेब शेंदुरकर,मंगल चंद्रकांत शिंदे,सर्व तलाठी व मंडळाधिकारी, आष्टी तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी,जनता कनिष्ठ महाविद्यालय, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद, मुख्याध्यापक व शिक्षक कर्मचारी वसुंधरा प्राथमिक विद्यालय आष्टी, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद कै.बाळशास्त्री जांभेकर माध्यमिक विद्यालय केरूळ, सर्व नातेवाईक, मित्रपरिवार,धानोरा परिसरातील सर्व ग्रामस्थ यांच्यासह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक,धार्मिक, व्यापार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.दशक्रिया विधी रविवार दि.२२ मार्च रोजी धानोरा येथे होणार आहे.

### बेलंबा गावच्या पोलीस पाटीलपदी ज्ञानेश्वरी गिते (आंधळे) यांची निवड

परळी । प्रतिनिधी



शहरातील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. दत्तात्रय आंधळे यांच्या सुकन्या तथा बेलंबा येथील केदारिनाथ गीते यांच्या सुविज्ञ पत्नी ज्ञानेश्वरी केदारीनाथ गीते (आंधळे) यांची परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बेलंबा गावच्या पोलीस पाटीलपदी निवड करण्यात आली आहे. शासनाच्या नियमानुसार पार पडलेल्या निवड प्रक्रियेनंतर दि. १० मार्च २०२६ रोजी त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा करण्यात आली. ज्ञानेश्वरीताई केदारनाथ गीते या गावातील सामाजिक कार्यात सदैव सक्रिय असतात. विविध सामाजिक, शैक्षणिक व ग्रामविकासाशी संबंधित उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे. त्यांच्या निवडीमुळे गावातील कायदा व सुव्यवस्था राखणे, प्रशासन व ग्रामस्थ यांच्यात समन्वय साधणे तसेच ग्रामविकासाच्या कामांना गती मिळेल, अशी अपेक्षा सर्व क्षेत्रातून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या निवडीबद्दल ज्ञानेश्वरी ताई गीते (आंधळे ) यांचे ॲड. दत्तात्रय आंधळे यांच्या निवासस्थानि परळी वैजनाथ येथील ज्येष्ठ नेते प्रभाकर देशमुख, वेदपाठक साहेब तसेच प्रतिष्ठित नागरिकांच्या वतीने पुष्पहार घालून पेढा भरवत सन्मान करण्यात आला. त्यांच्या निवडीबद्दल गावातील नागरिक, नातेवाईक व मित्रपरिवार यांच्याकडून देखील त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. पोलीस पाटील म्हणून गावातील कायदा सुव्यवस्था, शिस्त, शांतता व विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी ज्ञानेश्वरीताई गित्ते यांनी व्यक्त केला आहे.

# खिलाडू वृत्तीने चांगला समाज व निकोप राष्ट्रनिर्मिती होते -राजकिशोर मोदी

## निरोगी शरीर हे निरोगी मनाचे प्रतीक -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्व.प्रकाशचंद मुथा यांच्या स्मरणार्थ अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा अंबाजोगाई शहरातील क्रीडाप्रेमी, खेळाडू, पालक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या निमित्ताने क्रीडा संस्कृतीचा प्रसार आणि नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा संदेशही देण्यात आला. कार्यक्रमात बोलताना प्रमुख पाहुणे राजकिशोर मोदी यांनी खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञान युगात मुलांना मैदानावर खेळण्यासाठी प्रवृत्त करणे ही काळाची गरज बनली आहे. अंबाजोगाई शहरातील मुलांना मैदानावर आणून त्यांना योग्य प्रशिक्षण देण्याचे आणि राज्यस्तरावर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मोहित परमार आणि त्यांच्या सहकारी माही परमार करत आहेत. त्यांच्या अथक परिश्रमामुळे अनेक लहान खेळाडूंना मोठ्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळत आहे. ते पुढे म्हणाले की, खेळ हा केवळ मनोरंजनाचा भाग नसून तो जीवनाचा अविभाज्य घटक आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरूस्ती वाढते, मानसिक बळ मिळते आणि जीवनातील यश-अपयश स्वीकारण्याची क्षमता निर्माण होते. क्रिकेट हा खेळ आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय असून भारतीय खेळाडूंनी जगभरात आपल्या देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. अंबाजोगाई सारख्या शहरातूनही भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. तुम्हाला चांगला नागरिक आणि चांगला माणूस व्हायचे असेल तर आधी चांगला खेळाडू होणे गरजेचे आहे, असे सांगत त्यांनी उपस्थित लहान खेळाडूंना प्रेरणा दिली. त्यांनी स्व.प्रकाशचंद मूथा यांच्या कार्याची आठवण करून देताना सांगितले की, अंबाजोगाई शहरात विविध खेळांसाठी साहित्य सहज उपलब्ध व्हावे यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. शहरातील क्रीडा संस्कृती जपण्यासाठी आणि मुलांना खेळाकडे वळवण्यासाठी त्यांनी केलेले कार्य



प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात बोलताना अक्षय मुंदडा यांनी अंबाजोगाई शहरासाठी एक महत्त्वाची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, येत्या काळात अंबाजोगाई मध्ये आयपीएल फॅन पार्क आयोजित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. २०२७ मध्ये अंबाजोगाई शहरात जवळपास वीस हजार प्रेक्षक एकत्र येऊन मोठ्या स्क्रीनवर आयपीएल सामने पाहू शकतील असे भव्य फॅन पार्क आयोजित करण्याचा मानस आहे. यामुळे शहरातील क्रिकेटप्रेमींना आयपीएलचा थरार एकत्रितपणे अनुभवता येईल, असे त्यांनी सांगितले. यामुळे अंबाजोगाई शहराच्या क्रीडा संस्कृतीला नवे बळ मिळेल तसेच क्रिकेटप्रेमींना मोठ्या प्रमाणावर आनंद घेण्याची संधी मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. तसेच शहरातील तरूण खेळाडूंनी मेहनत, चिकाटी आणि शिस्त यांचा अवलंब करून आपल्या क्रीडा कारकिर्दीत यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी खेळाचे सामाजिक महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले की, खेळ ही अशी गोष्ट आहे जी समाजात सांघिक भावना टिकवून ठेवते आणि लोकांना एकत्र आणण्याचे काम करते. कोणताही खेळ असो, त्यामधून एकमेकांशी सहकार्य करण्याची वृत्ती निर्माण होते आणि टीमवर्कची भावना विकसित होते. आजच्या काळात मुले मोबाईल गेम्समध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतलेली दिसतात, त्यामुळे मैदानावर खेळणाऱ्यांची संख्या कमी होत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्यामुळे मुलांना मैदानावर येऊन खेळण्याची प्रेरणा मिळते आणि त्यांच्या प्रतिभेला योग्य व्यासपीठ उपलब्ध होते. ते पुढे म्हणाले की, अशाच छोट्या अकॅडमीमधून भविष्यात मोठे खेळाडू तयार होतात. रणजी ट्रॉफी, आयपीएल तसेच अंडर-१४, अंडर-१९ आणि भारतीय संघात खेळणारे अनेक खेळाडू अशाच पायाभूत स्तरावरून पुढे आले आहेत. त्यामुळे पालकांनीही आपल्या मुलांना खेळासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. विजेत्या संघाचे अभिनंदन करताना त्यांनी पराभूत संघांनी निराश न होता पुढील स्पर्धांमध्ये अधिक मेहनत घेऊन यश संपादन करण्याचा सल्ला दिला. यावेळी आंबजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी अंबाजोगाईतील क्रिकेटच्या इतिहासात मोहित परमार आणी माही परमार यांच्या अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमिने एक नवीन आयाम दिला आहे. मोबाईल व टीव्ही मध्ये मग्न झालेली आजची युवापिढी मैदानावर आणण्यासाठी हा क्रीडामंच उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ.इंगोले यांनी परमार क्रीडा प्रशिक्षक दाम्पत्यांचे आभार मानत निरोगी शरीरात निरोगी मन असणे अत्यावश्यक आहे आणि याद्वारे भारत महासता बनू शकते हा आशावाद त्यांनी व्यक्त केला. यावेळी जयकुमार लोढा, अक्षय परदेशी यांचे ही समायोचित मार्गदर्शन झाले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशिक्षक मोहित परमार यांनी केले तर प्रभावी सुत्रसंचालन अशोक तापडे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रभावी शैलीत संपूर्ण कार्यक्रम रंगतदार बनवला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्पर्धेचे आयोजक निलेश मुथा यांनी केले. या सन्मान सोहळ्यावेळी राजकिशोर मोदी, अक्षय मुंदडा, नगरसेवक संजय गंभीरे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, निलेश मूथा, डॉ.राजेश इंगोले, प्रेमलता मूथा, अशोक तापडे, अनितोष कातकडे, अविनाश साठे, साहेबां लोंढे, जयकुमार लोढा, सतीश बालुतकर, डॉ.संदीप जैन, अक्षय परदेशी, अभिजित जोधळे, सुरज कांबळे, सचिन भिसे, प्रतीक बोथरा, ऋषभ राका आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने क्रीडाप्रेमी, खेळाडू, पालक आणि नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा आणि सन्मान सोहळा शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यात अशा स्पर्धांमुळे अनेक नवोदित खेळाडूंना पुढे येण्याची संधी मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## बीड जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्ती व संस्थांनी दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर नोंदणी करावी -जितीन रहमान

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दिव्यांगांना एकाच संकेतस्थळावर सर्व लाभ मिळविण्यासाठी सोयीचे व्हावे यासाठी शासनाने दिव्यांग सहाय्यक पोर्टलची निर्मिती केली असून या पोर्टलवर बीड जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी मोठ्या प्रमाणात नोंदणी करून सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव, तुकाराम मुंडे यांच्या संकल्पनेतून दिव्यांग व्यक्ती व त्यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्था यांच्यासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टल निर्माण केले असून या पोर्टलच्या माध्यमातून अर्ज नोंदणी व तक्रार निवारण प्रमाणपत्र तसेच विविध योजनांची माहिती व इतर सेवा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांची नोंदणी व नोंदणी प्रमाणपत्र नुतनिकरण, दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य १० वी पुर्व शिष्यवृत्ती योजना, दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य शालांत परिक्षेनंतर मिळणारी शिष्यवृत्ती, गुणवत्ता पुरस्कार, दिव्यांग व्यक्तींसाठी साधने व उपक्रम यासाठी अर्थसहाय्य, दिव्यांगांच्या राज्य पुरस्कार योजना, शासकीय संस्थांमधून व्यवसायीक प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय संच व इतर साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थीक सहाय्य, दिव्यांग व्यक्तींना सामाजिक सुरक्षीततेअंतर्गत विवाह प्रोत्साहन योजना, मोदी आवास घरकूल योजना, रमाई आवास घरकूल योजना, प्रधानमंत्री आवास योजना, विशेष सहाय्य योजना, शहरी व ग्रामीण प्रमाणरूप दिव्यांगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उच्च श्रेणीत शिक्षण शिष्यवृत्ती यासह अन्य योजनांचा यात समावेश असून याचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग बांधवांनी व दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर आपली नोंदणी करावी. असे आवाहन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जितीन रहमान यांनी केले आहे.

तसेच दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना या पोर्टलवर आपली माहिती अद्यावत करणे आवश्यक आहे. तर नव्याने दिव्यांग क्षेत्रात काम करू इच्छिनाऱ्या संस्थांनी दिव्यांग क्षेत्रात काम करण्याकरीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी या शासकीय पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तींना या पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी प्रमाणपत्र असणे गरजेचे आहे. शिवाय ज्या दिव्यांग व्यक्तींना अद्यापही कार्ड प्राप्त नाही अशा दिव्यांग व्यक्ती सदर पोर्टलद्वारे कार्ड मिळण्याकरीता ऑनलाईन अर्ज करू शकता. आपल्या अर्जाची स्थिती सदर पोर्टलवर संबंधितांना पाहता येईल. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टल हे महत्वाचे पाऊल असून जिल्ह्यातील प्रत्येक पात्र दिव्यांग व्यक्तींनी या पोर्टलवर नोंदणी करून विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, तसेच सर्व गटविकास अधिकारी व ग्राम विकास अधिकारी यांनी दिव्यांग योजनांची व दिव्यांग सहाय्यक पोर्टलची माहिती सर्व दिव्यांगांपर्यंत पोहोचवावी. असे आवाहनही जितीन रहमान यांनी केले आहे.

## पान ६ वरुन...

### काळया बाजारासाठी

अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साईनाथ बारगळ करत आहेत. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत , अपर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती. पुजा पवार व पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे पोह/१८०३ नितीन राठोड, पोशि/कल्याण जाधव पोशि/८४ अंकुश राठोड होमगार्ड पठाण यांनी केलेली आहे.

### योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये

मुलाखतीसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल व यंत्र अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा.शाम गडदे, ऑटोमोबाईल विभाग प्रमुख प्रा. बप्पासाहेब सोनवणे यांनी परिश्रम घेतले. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे यो.शि. संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, का.उपाध्यक्ष ऍड. जगदीश चौसाळकर, सचिव कमलाकर चौसाळकर,कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य, संचालक प्रताप पवार प्राचार्य रमण देशपांडे यांनी अभिनंदन केले आहे.

### येडेश्वरीचे सर्वाधिक गाळप

प्रशासन यांच्यात चांगला समन्वय राखण्यात आला. तसेच कामगारांचे नियोजन, वाहतूक व्यवस्था आणि तांत्रिक व्यवस्थापन यामुळे गळीत प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडली. गळीत हंगामाच्या सांगता समारंभानिमित्त मिल पूजन करण्यात आले. यावेळी कारखान्याच्या प्रगतीसाठी सर्व घटकांनी परिश्रम घेतल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी खा.बजरंग सोनवणे म्हणाले, 'येडेश्वरी साखर कारखान्याचा २०२५-२६ चा गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण होणे ही आनंदाची बाब आहे. ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व कामगार यांच्या संयुक्त परिश्रमांमुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाली आहे. सर्व संबंधितांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. पुढील गळीत हंगाम अधिक यशस्वी व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो, असेही ते म्हणाले. दरम्यान, या यशस्वी हंगामानिमित्त ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, अधिकारी व कर्मचारी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून, पुढील हंगामासाठीही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### लोकनेते गोपीनाथ मुंडे

योजना राबविणे आवश्यक होते. परंतु अद्यापही या महामंडळा द्वारा प्रभावीपणे योजना राबवल्या जात नाहीत मागील दोन ते तीन वर्षापासून बीड जिल्ह्यात अनेक ऊसतोड कामगारांचे अपघात झाले ५० पेक्षा जास्त कामगारांचा मृत्यू झाला परंतु अद्यापही त्यांना विमा आणि सानुग्रह अनुदान देण्यात आलेले नाही. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून मागील दोन-तीन वर्षांमध्ये वस्तीगृह बांधकाम, मध्यवर्ती कार्यालय बांधकाम, विभागीय कार्यालय दुरुस्ती, पाणी फिल्टर, ओळखपत्र, आनंदाचा शिधावाटप करणे या योजनांच्या कोट्यावधी रुपयांच्या निविदा प्रक्रिया राबवल्या गेल्या आहेत या योजना कागदोपत्री आहेत की ? त्याची अंमलबजावणीची स्थिती काय आहे ? याचाही आढावा घेण्याची आमदार सुरेश धस यांनी मागणी केली आहे.यावेळी त्यांच्यासोबत कामगार कल्याण मंडळाचे श्री केंद्रे साहेब आणि ऊस तोडणी कामगारांच्या अपघात व विमा वैद्यकीय उपचारासाठी सक्रिय असणारे बीड येथील श्री बबन माने उपस्थित होते

### गायक राज रायते यांचा

गायनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत त्यांनी अनेक ठिकाणी कार्यक्रम सादर केले आहेत. तसेच विविध राज्यस्तरीय पुरस्कार आणि सन्मानही त्यांनी मिळवले आहेत. पुरस्कार स्विकारल्यानंतर बोलताना राज रायते म्हणाले की, ''माझ्या सर्व यशाचे श्रेय संत संताजी जगनाडे महाराजांच्या कृपेने तसेच तेली समाज बांधवांच्या प्रेम आणि पाठिंब्यामुळे मिळाले आहे. माझे पंजोबा संत आसारामजी वैजनाथराव रायते, आजोबा चंद्रकांत आसारामजी रायते, वडील प्रल्हाद रायते आणि मातोश्री सोनाली रायते यांच्या आशीर्वादामुळेच मी या क्षेत्रात काम करू शकलो.'' यापुढेही संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित नवी भक्तिगीते सादर करण्याचा संकल्प असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या सन्मानामुळे रायते कुटुंबासह संपूर्ण तेली समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### फुकटचे श्रेय घेऊ नका, बाळराजे

चमकोगिरी करण्याच्या उद्देशाने सदरील निवेदन देण्यात आलेले आहे. वास्तविक पाहता, गेल्या काही दिवसांपासून नगर परिषद प्रशासन आणि विद्यमान नगराध्यक्षा सौ. गीता भाभी बाळराजे पवार आणि सत्तेतील नगरसेवकांनी आपआपल्या वॉर्डातील कामे सुरू केली आहेत. स्वतः बाळराजे दादा पवार प्रत्येक वार्डात जाऊन आढावा घेत आहेत. त्या दृष्टीकोनातून विकास कामे सुरू झाली आहेत. महत्त्वपूर्ण ठिकाणी विद्युत व्यवस्था करण्यात आलेली आहे. स्वच्छतेची कामे केली जात आहेत. असे असताना, विरोधी बाकावर बसलेले नगरसेवक नसती उठाठेव करून, प्रसिद्धी साठी निवेदनाचे नाटक करीत आहेत. गेवराई शहरातील बहाद्दर नागरीकांनी नगर परिषदेची सत्ता भाजपाचे नेते माजी मंत्री बदामराव पंडित आणि युवा नेते बाळराजे पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून दिली आहे. त्यामुळे, नवनिर्वाचित नगराध्यक्षांसह सत्ताधारी नगरसेवक

शहराच्या विकासात कुठेही कमी पडणार नाहीत. विकास कामांना सुरुवात झाली असून, विरोधी नगरसेवकांना फुकटचे क्षेय घेऊन, स्वतःचे हसे करून घेऊ नये, असा टोला खदिर बागवान यांनी लगावला आहे.

## जय महाराष्ट्र कर्मचारी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी शिवाजीराव चव्हाण

बीड । प्रतिनिधी

शासकीय विश्रामगृहामध्ये दिनांक १३ मार्च रोजी जय महाराष्ट्र शासकीय निम शासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेची मोठ्या थाटात बैठक संपन्न झाली. यावेळी संघटनेचे राज्य अध्यक्ष अशोक विठ्ठलराव डहाळे हे बीड दौऱ्यावर असताना जय महाराष्ट्र शासकीय निम-शासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेची जबाबदारी कामात निष्ठावंत,प्रत्येकाला सहकार्याची भूमिका असणारे वरिष्ठ लिपिक पंचायत विभाग जिल्हा परिषद बीड येथील शिवाजी चव्हाण यांची जिल्हाध्यक्ष या पदावर सर्वानुमते निवड करण्यात आली.



राज्य अध्यक्ष अशोक डहाळे यांनी मनोगतामध्ये म्हटले की काही महिन्यातच आपली संघटना स्थापन होऊन आपण आतापर्यंत १७००० कर्मचारी एकत्रित करू शकलो. येणाऱ्या भविष्यात कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रमाणिकपणे संघटनेच्या माध्यमातून मांडू व सर्वांना न्याय द्यायचा प्रयत्न करू अशी ग्वाही त्यांनी दिली. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष शिवाजी तात्या चव्हाण यांनी देखील वरिष्ठांनी दिलेली जबाबदारी प्रमाणिक पार पाडून संघटनेला व शासकीय निमशासकीय अधिकारी कर्मचारी यांचे प्रश्न प्रमाणिकपणे सर्वांच्या सहकार्याने मार्गी लावू असे संबोधन करत सर्वांचे धन्यवाद व्यक्त केले. यावेळी राज्याध्यक्ष अशोक डहाळे , जिल्हा पालक अध्यक्ष श्रीरंग धनवे, जिल्हा कार्याध्यक्ष महादेव सोनवलकर, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कुलकर्णी, राज्य महिला अध्यक्ष पुरी मॅडम, राज्य उपाध्यक्ष छाया भूषण मॅडम, माजलगाव तालुका अध्यक्ष गव्हाणे, गेवराई तालुका अध्यक्ष देशमुख, सदस्य विशाल तळेकर , मनोज आविळे जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर सर, जिल्हा व्यवस्थापक अशोक खरसाडे आदी अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यातील साखर कारखान्यावर डिजिटल वजन काटे बसवा -प्रा. बबनराव आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक १३/०३/२०२६. महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यामध्ये उसाच्या वजनात होत असलेल्या कथित काटामारी व रिकव्हरी या गैरप्रकारामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे सर्व साखर कारखान्यावर शासनाच्या नियंत्रणाखाली डिजिटल वजन काटे बसून ते थेट शासनाच्या मुख्य सर्व्हरशी ऑनलाईन जोडावेत अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे साखर प्रश्न ना संदर्भात राज्यातील अनेक साखर कारखान्यामध्ये उसाच्या वजनात फेरफार होणाऱ्या तक्रारी सातत्याने येत आहेत काही ठिकाणी उसाच्या वजनात १० ते १२ टक्क्या पर्यंत घट होत असून त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी,



वाहतूकदार तसेच ऊसतोड मजूर आर्थिक अडचणीत सापडत असल्याचे श्री आंधळे यांनी सांगितले या पार्श्वभूमीवर शासनाने हस्तक्षेप करून सर्व साखर कारखान्यामध्ये शासनाच्या देखरेखी खाली स्वतंत्र डिजिटल वजन काटे बसवावेत असे त्यांनी सुचवले आहे ते काटे थेट शासनाच्या मुख्य सर्व्हरशी जोडले गेल्यास प्रत्येक उसाच्या गाडीचे वजन थेट शासनाच्या नोंदत उपलब्ध होईल आणि वजनात फेरफार होण्याची शक्यता कमी होईल असेही त्यांनी नमूद केले प्रमुख मागण्या १) शासनाने २०२६ २७ च्या गळीत हंगामापासून पारदर्शक डिजिटल प्रणाली लागू करावी २) राज्यातील सर्व साखर कारखान्यावर शासनाच्या नियंत्रणाखाली डिजिटल वजन काटे बसवावेत.३) वजन काटे थेट शासनाच्या मुख्य सर्व्हरशी ऑनलाईन जोडावेत ४) उसाच्या प्रत्येक गाडीचे वजन शासनाच्या नोंदीत उपलब्ध होईल अशी प्रणाली उभारावी ५) २०२६- २७ च्या गळीत हंगामापासून ही पारदर्शक व्यवस्था लागू करावी ६) निधी अभावी आमदार खासदार निधी किंवा शेतकऱ्याच्या संमतीने उपलब्ध बिलातून नाममात्र कपात करून खर्च करावा. तसेच हे काटे बसवण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यास आमदार खासदार निधीचा वापर करावा किंवा शेतकऱ्याच्या संमतीने उसाच्या बिलातून नाम मात्र कपात करून ही व्यवस्था करावी अशी मागणी ग्रामीण संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रका द्वारे केली आहे.

## टाकळसिंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. सायली जगताप यांची वैद्यकीय अधिकारीपदी नियुक्ती; ग्रामस्थांकडून सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पंचायत समितीचे सभापती बद्रीनाथ जगताप यांची कन्या डॉ. सायली जगताप यांची वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असून त्यांनी आष्टी तालुक्यातील टाकळसिंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पदभार स्वीकारला आहे. त्यांच्या या यशाबद्दल टाकळसिंग येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



डॉ. सायली जगताप यांचे प्राथमिक शिक्षण पहिली ते चौथीपर्यंत वस्ती शाळेत झाले. त्यानंतर पाचवी ते आठवीपर्यंत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंग येथे शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी कन्या प्रशाला, आष्टी येथे दहावीपर्यंत शिक्षण घेतले. अकरावी व बारावीचे शिक्षण त्यांनी लातूर येथील राजश्री शाहू कॉलेजमध्ये पूर्ण केले.महाराष्ट्राचे माजी मंत्री व मराठवाडा भूषण, आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वैद्यकीय क्षेत्राची वाट निवडली. त्यानंतर डहाणू येथील एमबीबीएस महाविद्यालयात प्रवेश मिळवून त्यांनी एमबीबीएस पदवी प्रथम श्रेणीत पूर्ण केली. सध्या त्या पुढील पीजी शिक्षणासाठीही तयारी करत आहेत.आमदार सुरेश धस यांच्या




मार्गदर्शनानुसार बीड जिल्ह्यातील रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकारी पदांसाठी अर्ज केल्यानंतर त्यांची टाकळसिंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. या यशाचे संपूर्ण श्रेय बद्रीनाथ जगताप यांनी आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाला दिले असून आमच्या कुटुंबाची प्रगती आ.धस यांच्या मार्गदर्शनामुळेच झाली आहे. ते आमच्या कुटुंबासाठी दैवतासारखे आहेत अशी भावना यावेळी बद्रीनाथ जगताप यांनी व्यक्त केली.

सत्कार समारंभ प्रसंगी सरपंच बलभीम वाघमोडे, चेअरमन अंगद जगताप, ग्रामविकास अधिकारी नवनाथ लोंढे, माजी सरपंच कांतीलाल जोगदंड, बाळासाहेब जगताप, संभाजी जगताप, विश्वंभर जगताप, अण्णासाहेब जगताप, लक्ष्मण कुमकर, डॉ. सुनील पठाडे, केशव जगताप, भाऊसाहेब नेटके, सखाराम बनकर, डिगांबर जगताप, मुख्याध्यापक महेश शिंदे, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सोसायटी सदस्य तसेच टाकळसिंग येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार सुरेश धस यांचे मोलाचे मार्गदर्शन; आमच्यासाठी दैवताप्रमाणे बद्रीनाथ जगताप ''आमदार सुरेश धस यांचे आम्हाला नेहमीच मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. माझी मुलगी डॉ. सायली जगताप हिने डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले त्या दिवसापासून ते ते स्वप्न साकार होईपर्यंत आमदार सुरेश धस यांनी आम्हाला सतत प्रेरणा, मार्गदर्शन आणि आधार दिला. केवळ राजकीय नेतृत्व नव्हे तर कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याप्रमाणे त्यांनी आमच्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून वेळोवेळी सहकार्य केले. आज माझ्या मुलीने वैद्यकीय अधिकारी म्हणून पदभार स्वीकारणे हे आमच्यासाठी अभिमानाचे क्षण आहेत. या यशामागे आमदार सुरेश धस यांचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि आशीर्वाद मोठ्या प्रमाणात लाभले आहेत. आमच्या कुटुंबाच्या प्रत्येक यशामागे त्यांचे मोलाचे योगदान असून ते आमच्यासाठी दैवताप्रमाणे आहेत,'' अशी भावना आष्टी पंचायत समितीचे सभापती बद्रीनाथ जगताप यांनी व्यक्त केली.

# ४५ हजार हेक्टरवर बोगस केळी विमा!

## जळगाव परिसरात खळबळ, पीकविमा योजनेत मोठा घोटाळा झाल्याचे उघड

पुणे : जळगाव जिल्ह्यासह परिसरात हवामानावर आधारित केळी पीकविमा योजनेत मोठा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर संबंधित शेतकऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येत आहे. शेतात केळी लागवड केली नसतानाही केळी पिक विमा उतरणाऱ्या शेतकऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. कृषी विभागाने एमआरसॅक'द्वारे केलेल्या 'सॅटेलाईट' पडताळणीत तब्बल ४५ हजार हेक्टर क्षेत्रावर केळी लागवड नसताना, बोगस केळी विमा काढल्याचे स्पष्ट झाले आहे.

बोगस विमा काढणाऱ्या ५५ हजार शेतकऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. त्याचा खुलासा आल्यावर त्यात दोषी आढळून आलेल्या शेतकऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. जळगावातील चोपडा तालुक्यातून सर्वाधिक तर त्यापाठोपाठ रावेर, जळगाव, धरणगाव, मुक्ताईनगर व जामनेर या सात तालुक्यात बोगस विमा काढल्याचे समोर आले आहे. बोगस विमा काढणाऱ्या २७ हजार व दुसऱ्याचा शेतात विमा काढणाऱ्या २९ हजार, अशा एकूण ५५ हजार शेतकऱ्यांना नोटिसा



पाठवण्यात आल्या आहेत, केळी लागवड नसताना २७ हजार शेतकऱ्यांकडून विमा काढण्यात आला तर २९ हजार शेतकऱ्यांनी दुसऱ्याचा शेतजमिनीवर असे एकूण ५५ हजार शेतकऱ्यांनी बोगस विमा काढल्याची माहिती समोर आली आहे. ज्या सीएससी केंद्रांवर बोगस फॉर्म भरले गेलत अशा ४८ केंद्र चालकांवर देखील चौकशीनंतर गुन्हा दाखल करण्याची प्रशासनाची तयारी आहे. शासनाची कोट्यावधींची फसवणूक करण्याचा हा मोठा प्रयत्न कृषी विभागाकडे हाती आलेल्या अहवालानंतर उघड झाला आहे. या प्रकरणात चौकशीसाठी समिती नियुक्त करण्यात आली असून, चौकशी तसेच नोटीस वर संबंधितांचे उत्तर आल्यानंतर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. कृषी विभागाने एमआरसॅक'द्वारे केलेल्या 'सॅटेलाईट' पडताळणीत तब्बल ४५ हजार हेक्टर क्षेत्रावर केळी लागवड नसताना, बोगस केळी विमा काढल्याचे स्पष्ट झाले आहे. बोगस विमा काढणाऱ्या ५५ हजार शेतकऱ्यांना नोटीसा देखील बजावण्यात आल्या आहेत. केळी पिक विमा उतरणाऱ्या शेतकऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या शासनाच्या या कृतीचा महाराष्ट्र शेतकरी संघटनेने निषेध केला आहे. शेतकऱ्यावर कारवाई झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकरी संघटनेने दिला आहे

# शेळ्यांचे जंत निर्मुलन व आरोग्य व्यवस्थापन



शेळीला गरीबाची गाय असे संबोधले जाते. शेळी ही रोगाला फारशी बळी पडत नाही, परंतु विशेषतः पावसाळ्यात शेळीची विशेष काळजी घ्यावी लागते. त्याकरिता वेळेवर लसीकरण करणे, नियमित जंत निर्मुलन, गोठ्याची स्वच्छता, गव्हाणीचा वापर या बाबींचा आरोग्यावर निश्चित परिणाम होतो.

शेळ्यांच्या जंतनिर्मुलनासाठी जंतनाशकाचा वापर शेळ्यांची सदृढ पचनसंस्था व आरोग्यासाठी जंत निर्मुलन करून घेऊन खालीलप्रमाणे जंतनाशक औषधांचा वापर करावा. करडांच्या वयाच्या २० ते ३० दिवसापासून जंतनाशक औषधे देता येतात. जानेवारी व जुलै - अल्बेन्डाझॉल १० मि.ग्रॅ. प्रति किलो वजनाप्रमाणे चपटेकृमी व गोलकृमी जंतांच्या निर्मुलनासाठी वापरावे. एप्रिल व ऑक्टोबर - डोस्टोडीन किंवा झोनील पैकी कोणतेही एक औषध यकृत कृमीच्या निर्मुलनासाठी १० मि.ग्रॅ. प्रतिकिलो वजनाप्रमाणे वापरावे.

लाळ्याखुरकत - हा विषाणूजन्य रोग आहे. या रोगाच्या प्रमुख लक्षणामध्ये शेळ्यांच्या जिभेवर तोंडात, पायात, कासेवर आणि तोंडाच्या आतील भागावार फोड येतात. तोंडातून जास्त प्रमाणात लाळ पडते. उपचार व प्रतिबंध - या रोगामुळे शेळ्यांचे खाणे-पिणे कमी होते. त्यामुळे शेळ्या कमजोर होतात. त्याकरिता त्यांना पाण्यातून जीवनसत्त्वे द्यावेत. जिभेचे फोड अन्टीसेप्टीक औषध लावून धुवावे. प्रतिबंधात्मक उपचाराकरिता वर्षातून दोन वेळा लस टोचून घ्यावे. (१ मि.ली.) वरीलप्रमाणे शेळयांचे व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना शेळीपालन एक किफायतशीर व्यवसाय फायद्याचा ठरेल व शेळीपालकांचा आर्थिक स्तर उंचावेल.

# मुख्यमंत्री शाश्वत कृषी योजनेतून शेततळ्यांसाठी निधी आला; अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरू

पुणे / प्रतिनिधी

मुख्यमंत्री शाश्वत कृषी योजनेच्या अंमलबजावणीसाठी २०२५-२६ मध्ये ५०० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी सूक्ष्म सिंचनासाठी ४०० कोटी रुपये आणि वैयक्तिक शेततळ्यांसाठी १०० कोटी रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, मुख्यमंत्री कृषी शाश्वत सिंचन योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन आणि वैयक्तिक शेततळे या योजना राबविल्या जातात. या योजनेंतर्गत 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर महाडीबीटी पोर्टलद्वारे अर्ज स्वीकारण्यात आले असून राज्यात सूक्ष्म सिंचनासाठी ८,२६,९८१ शेतकरी आणि वैयक्तिक शेततळ्यासाठी २६,९७२ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रे वेळेत अपलोड न करणे, शेतजमीन



तांत्रिकदृष्ट्या शेततळ्यासाठी योग्य नसणे आदी कारणांमुळे १७,२१४ अर्ज रद्द करण्यात आले असून ९,७५८ अर्जांवर सध्या कार्यवाही सुरू आहे. यापैकी ७,४६८ शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे अपलोड केली असून ४,२३२ अर्जांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देऊन पूर्वसंमती देण्यात आली आहे. २ मार्च २०२६ पर्यंत १,१२५ शेतकऱ्यांकडून काम पूर्ण झाल्याचा अहवाल प्राप्त झाला असून त्यापैकी ८५३ शेततळी तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण असल्याने त्यांच्या अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. ८५३ शेततळ्यांपैकी ६७३ शेततळ्यांना आतापर्यंत ४ कोटी ३२ लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. तांत्रिकदृष्ट्या योग्य प्रकारे काम पूर्ण होऊनही अनुदान मिळाले नाही किंवा अनुदान मिळण्यास विलंब होत असल्याची कोणतीही तक्रार जिल्हास्तरावर प्राप्त झालेली नसल्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी स्पष्ट केले.

# महात्मा फुले कृषी विद्यापीठात पदवीप्रदान समारंभ

राहुरी / प्रतिनिधी

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात रविवारी (दि.१५) ३९ वा पदवीप्रदान समारंभ होणार आहे. कृषी विद्यापीठातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये होणाऱ्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'मानद डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल व महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलपती जिष्णू देव वर्मा हे असणार आहेत. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे




पाटील, कृषिमंत्री तथा प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे आणि कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी नवी दिल्ली येथील भाकृअप-भारतीय कृषी संशोधन संस्थेचे माजी संचालक आणि भाकृअप-भाकृसंसं अनुवंशशास्त्र विभागाचे मानद शास्त्रज्ञ डॉ. अशोक कुमार सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच कुलगुरू डॉ. विलास खर्चे, विद्यापीठ कार्यकारी आणि विद्यापरिषदेचे सदस्य उपस्थित राहणार आहेत. या समारंभात गेल्या वर्षातील विविध विद्याशाखांतील एकूण ४,६०२ स्नातकांना पदवी, पदव्युत्तर, आचार्य पदवीने सन्मानित करण्यात येणार आहेत. त्यात विविध विद्याशाखातील ४,१८२ स्नातकांना पदवी, ३४६ स्नातकांना पदव्युत्तर पदवी तर ७४ स्नातकांना आचार्य पदवीने अनुग्रहित केले जाणार आहे. या वेळी ४२ यशस्वी स्नातकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९३१ : 'आलम आरा' हा पहिला भारतीय बोलपट मुंबईतील नॉव्हेल्टी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला.
१९५४ : दिल्ली येथे साहित्य अकादमीची स्थापना झाली.
१९५५ : राजकुमार महेन्द्र हे नेपाल देशाचे राजा बनले.
१९६७ : अमेरीकेचे माजी अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांचे पार्थिव आर्लिंग्टन राष्ट्रीय दफनभूमी येथे हलविण्यात आले.
१९७६ : अमेरिकेने नेवादा या ठिकाणी परमाणु चाचणी केली.
१९८८ : जपानमध्ये समुद्रांतर्गत रेल्वे वाहतुकीस प्रारंभ
१९८८ : गणित प्रेमीनी प्रथम पाय डे साजरा केला होता. पाय डे संकल्पना भौतिकशास्त्रज्ञ लॅरी शॉ यांनी १९८८ मध्ये केली होती. (= ३.१४) ही पायाची किंमत दिनांक १४/३ प्रमाणे असल्याचे त्यांच्या लक्षात आले.
१९८८ : प्रथम सोनिया गांधी राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या अध्यक्ष बनल्या.
२००० : कलकत्ता येथील 'टेक्निशियन आय' हा देशातील सर्वात जुना स्टुडिओ आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.
२००१ : व्ही. व्ही. एस. लक्ष्मणने ईडन गार्डन वर नाबाद २७५ धावा काढून या मैदानावरील सर्वोच्च धावांचा सुनील गावसकरचा विक्रम मोडला. तसेच एका डावात ४४ चौकार मारण्याच्या डॉन ब्रॅडमन यांच्या विक्रमाची बरोबरी केली.
२००१ : चोकिला अय्यर यांनी भारताच्या पहिल्या महिला परराष्ट्रसचिव म्हणून सूत्रे हाती घेतली. त्या सिक्कीममधील आदिवासी समाजातील असून १९६४ च्या बॅचमधील आय. ए. एस. अधिकारी आहेत.
२००७ : कारगिल आणि स्कार्दू यादरम्यान भारत व पाकिस्तान यांच्यात बस सेवा प्रारंभ करण्याबद्दल सहमती झाली.
२०१० : ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या हस्ते 'लोकसंस्कृती'चे उपासक आणि संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांना 'पुण्यभूषण पुरस्कार' पुण्यात देण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३३ : पहिली महिला दंतचिकित्सक हॉब्स टेलर यांचा जन्मदिवस.
१८७४ : फिलिप्स इलेक्ट्रॉनिक्स कंपनी चे सहसंस्थापक आंतोन फिलिप्स यांचा जन्म. (मृत्यू: ७ ऑक्टोबर १९५१)
१८७९ : अल्बर्ट आइनस्टाईन नोबेल पारितोषिक विजेते जर्मन-अमेरिकन भौतिकशात्रज्ञ (मृत्यू: १८ एप्रिल१९५५)
१८९९ : इर्विग ओईल कंपनी चे संस्थापक के. सी. इर्विग यांचा जन्म. (मृत्यू: १३ डिसेंबर १९९२)
१९०८ : विन्सेंट मोटारसायकल कंपनी चे संस्थापक फिलिप व्हिन्सेंट यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९७९)
१९३१ : प्रभाकर पणशीकर ख्यातनाम अभिनेते (मृत्यू: १३ जानेवारी २०११)
१९३३ : मायकेल केन ब्रिटिश अभिनेता
१९६१ : ब्लॅकबेरी लिमिटेड चे संस्थापक माईक लाझारीडीस यांचा जन्म.
१९६३ : ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ब्रूस रीड यांचा जन्म.
१९६५ : भारतीय चित्रपट सुष्टीतील मिस्टर परफेक्टनिस्ट म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध अभिनेता अमीर खान यांचा जन्मदिन.
१९७२ : भारतीय कवी इरोम चानू शर्मिला यांचा जन्म.
१९७४ : साधना घाणेकर ऊर्फ 'साधना सरगम' पार्श्वगायिका

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : कार्ल मार्क्स, समाजवादी विचारवंत व लेखक
१८८३ : कार्ल मार्क्स जर्मन तत्त्वज्ञ व कम्युनिझमचे प्रणेते (जन्म: ५ मे १८१८)
१९३२ : जॉर्ज इस्टमन अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (जन्म: १२ जुलै १८५४)
१९६३ : भारताचे प्रमुख स्वतंत्रता सेनानी, राजस्थानचे पूर्व मुख्यमंत्री आणि 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' चे प्रसिद्ध नेता जयनारायण व्यास यांचे निधन.
१९९८ : दादा कोंडके अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक, संवादलेखक (जन्म: ८ ऑगस्ट १९३२)
२००३ : कवी सुरेश भट (जन्म: १५ एप्रिल १९३२)
२०१० : गोविंद विनायक तथा 'विंदा' करंदीकर लेखक, कवी, लघुनिबंधकार व टीकाकार.(जन्म: २३ ऑगस्ट १९१८)
२०१८ : विश्व प्रसिद्ध इंग्रजी भौतिकशास्त्रज्ञ, लेखक तसेच, सिद्धांत कॉस्मोलॉजी सेंटर फॉर रिसर्चचे डायरेक्ट स्टीफन्स हॉकिंग यांचे निधन.

# पिकांच्या वाढीसाठी नत्र आवश्यक

पिकांच्या वाढीसाठी पाण्यानंतर सर्वांत महत्त्वाचे अन्नद्रव्य म्हणजे नायट्रोजन (नत्र) होय. वनस्पतींमध्ये घडणाऱ्या प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या हरितलवकाच्या निर्मितीत नायट्रोजनचा मुख्य सहभाग असतो. याशिवाय वनस्पतींच्या पेशींमध्ये घडणाऱ्या सर्व जैवरासायनिक क्रियांमध्ये आवश्यक असलेली अमिनो ॲसिड्स, प्रथिने, एन्झाईम्स तसेच न्यूक्लिक ॲसिड यांच्या निर्मितीसाठी नायट्रोजन हा मूलभूत घटक आहे. त्यामुळे मुळांची वाढ, खोडाची जाडी, पानांची संख्या, फुटवा, फुलधारणा व दाणे भरणे या सर्व प्रक्रियांमध्ये नायट्रोजन निर्णायक भूमिका बजावतो.

नत्र हे अन्नद्रव्य पिकांमध्ये वहनशील असल्यामुळे त्याची कमतरता सर्वप्रथम पिकांच्या तळाकडील किंवा जुन्या पानांवर दिसून येते. पाने पिवळी पडणे, वाढ मंदावणे आणि उत्पादन घटणे ही नत्र कमतरतेची प्रमुख लक्षणे आहेत. पिके नायट्रोजनचे शोषण प्रामुख्याने 'मास फ्लो' पद्धतीने करतात. म्हणजे जमिनीत पाण्यासोबत जेवढे नत्र विरघळलेले असते, तेवढे नत्र मुळांद्वारे पिके शोषून घेतात. त्यामुळे जमिनीतील ओलावा, सिंचन व्यवस्थापन आणि नत्राची उपलब्धता



यांचा घनिष्ठ संबंध आहे. कोरड्या जमिनीत नत्र असले तरी ते पिकांना उपलब्ध होत नाही. पिके नत्राचे शोषण नायट्रेट आणि अमोनियम या दोन स्वरूपांत करतात. नायट्रेट स्वरूपातील नत्र शोषण्यासाठी पिकांना ऊर्जेची आवश्यकता भासते, तर अमोनियम स्वरूपातील नत्र थेट पिकांना उपलब्ध होते. अमोनिअम आयन हे धनभारित असल्यामुळे त्याच्या शोषणावेळी पिकांच्या मुळांकडून जमिनीत हायड्रोजन आयन सोडले जातात. त्यामुळे मुळांच्या परिसरातील जमिनीचा सामू कमी होतो. याउलट नायट्रेट शोषणाच्या वेळी मुळांच्या परिसरातील सामू वाढतो. म्हणूनच पिकांच्या सुरुवातीच्या वाढीच्या अवस्थेत अमोनिअम स्वरूपातील नत्र अधिक उपयुक्त ठरते, तर नंतरच्या वाढीच्या अवस्थेत नायट्रेट स्वरूपातील नत्र अधिक फायदेशीर ठरते.

नत्राची कमतरता धोकादायक : नत्राची कमतरता असल्यास पिकांमध्ये इतर अन्नद्रव्यांचीही कमतरता जाणवते, कारण पिकांची वाढच मर्यादित राहते. मात्र नत्रयुक्त खतांचा अतिरेकी वापर केल्यास बोरॉन, कॉपर आणि पोटॅशिअम यांची कमतरता निर्माण होऊ शकते, तर मॅग्नेशिअमची गरज वाढते. मॉलिब्डेनियम या सूक्ष्म अन्नद्रव्यामुळे नायट्रेटचे अमोनियममध्ये रूपांतर सुलभ होते, त्यामुळे नत्राचा वापर अधिक कार्यक्षम होतो. नायट्रेट व अमोनिअमच्या संतुलित वापरामुळे फॉस्फरसचे शोषणही सुधारते. मात्र ज्या जमिनीत किंवा पाण्यात क्लोरिनचे प्रमाण जास्त असते, तेथे नायट्रेटचे शोषण कमी होते, ही बाब महत्त्वाची आहे.

युरिया वापर करताना : युरियामध्ये ४६ टक्के नत्र उपलब्ध असते. मात्र ज्या जमिनीचा सामू जास्त (अल्कधर्मी) आहे आणि जिथे तापमान जास्त असते, अशा परिस्थितीत युरियामधील नत्राचा मोठा भाग व्होलाटायझेशनमुळे अमोनिया स्वरूपात हवेत निघून जातो. विशेषतः युरिया जमिनीच्या पृष्ठभागावर टाकल्यास ही प्रक्रिया अधिक प्रमाणात घडते. अनेक अभ्यासानुसार युरिया दिल्यानंतर २ ते ३ आठवड्यांत २० ते ३० टक्के नत्र वाया जाण्याची शक्यता असते. युरियाच्या हायड्रोलिसिस प्रक्रियेमुळे काही काळासाठी जमिनीचा सामू वाढतो. सतत युरियाचा वापर केल्यास जमिनीत कॅल्शिअम कार्बोनेटचे प्रमाण वाढते, ज्याचा दीर्घकालीन परिणाम जमिनीच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मांवर होतो. परिणामी, जमिनीची सुपीकता आणि अन्नद्रव्यांची उपलब्धता हळूहळू कमी होत जाते.अमोनिअम सल्फेटचा वापर : अमोनिअम सल्फेट हे खत युरियाला एक प्रभावी आणि शास्त्रीयदृष्ट्या योग्य पर्याय ठरते. अमोनिअम सल्फेटमध्ये २१ टक्के नत्र (अमोनिअम स्वरूप) आणि २४ टक्के सल्फर (गंधक) उपलब्ध असते. या खतामधील नत्राचे व्होलाटायझेशन प्रमाण साधारणपणे १० ते १४ टक्के इतकेच असते, जे युरियाच्या तुलनेत खूपच कमी आहे. अमोनिअम सल्फेटचा प्रमुख फायदा म्हणजे हे खत जमिनीचा सामू कमी करण्यास मदत करते. त्यामुळे अल्कधर्मी जमिनीत नत्राची उपलब्धता वाढते. तसेच गंधक हा दुय्यम अन्नद्रव्य असून तेलबिया, डाळी आणि कडधान्य पिकांसाठी तो अत्यंत आवश्यक आहे.

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

# वाळू माफियाकडून सुनील उंबरहंडेवर हल्ला करून ट्रॅक्टर पळवले!

## आरोपींवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश




अंबड। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली, अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वात दि. १३ मार्च रोजी आपेगाव-साष्ट पिंपळगाव परिसरात अवैध गौण खनिज उत्खननाविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली. मात्र, ही कारवाई करत असताना वाळू माफियांनी महसूल पथकातील तलाठी सुनील उंबरहंडे यांच्यावर हल्ला करून कायदेशीररित्या ताब्यात घेतलेले ट्रॅक्टर बळजबरीने पळवून नेल्याची गंभीर घटना घडली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की तहसीलदार विजय चव्हाण यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, मोजे आपेगाव-साष्ट पिंपळगाव परिसरातून अवैध वाळूची वाहतूक सुरू आहे. या माहितीच्या आधारे तहसीलदार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी श्री. उंबरहंडे व त्यांच्या पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले. पथकाने घटनास्थळी धाव घेतली असता, करण संकुश घुले (रा. भांबेरी) हा ट्रॅक्टरमधून अवैध वाळू वाहतूक करताना आढळला. पथकाला पाहताच चालकाने ट्रॅक्टरमधील रेती खाली करून पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पथकाने पाठलाग करून भांबेरी शिवारामध्ये ट्रॅक्टर अडवून ते कायदेशीररित्या ताब्यात घेतले. सदर पथकाने ट्रॅक्टरचा नंबर व ट्रॅक्टर फोटो घेतले तसेच पळून जाताना व्हिडिओ घेतले आहे. तसेच तेथे उपस्थित असलेल्या काही व्यक्तीचे फोटो घेतले आहे.

शासकीय पथकावर हल्ला आणि 'दरोडा': सदर ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्याचे निर्देश असताना, आरोपी करण घुले याने त्याचे ७ ते ८ साथीदार घटनास्थळी बोलावून घेतले. या टोळक्याने पथकातील तलाठी व त्यांच्या सहकाऱ्यांना बळजबरीने पकडून ठेवत त्यांना धक्काबुक्की केली. ''ट्रॅक्टर सोडून द्या, अन्यथा जीवे मारू,'' अशी धमकी देत या माफियांनी शासकीय कर्मचाऱ्यांवर दबाव आणला. अत्यंत उद्दामपणे वागत, कायदेशीर प्रक्रियेनुसार ताब्यात घेतलेले ट्रॅक्टर या आरोपींनी बळाचा वापर करून पळवून नेले. शासकीय मालमत्ता अशा प्रकारे बळजबरीने हिसकावून नेणे, हा गंभीर स्वरूपाचा 'दरोडा' असून प्रशासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा हा प्रकार आहे.मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन उघड : या कारवाईदरम्यान पथकाने गोदावरी नदी पात्राची पाहणी केली असता, तिथे अंदाजे ५ ते ६ मीटर खोलीचे मोठे खड्डे आढळून आले. प्राथमिक अंदाजानुसार, आरोपींनी सुमारे २०० ते ३०० ब्रास रेतीचे अवैध उत्खनन केल्याचे निष्पन्न झाले असून, यामुळे पर्यावरणाची मोठी हानी व शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाला आहे. कठोर कायदेशीर कारवाईचे आदेश : या घटनेची गंभीर दखल घेत तहसीलदार विजय चव्हाण यांनी आरोपींवर खालील कलमान्वये गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत:

# दैनंदिन, आठवडे बाजाराचा ठेका ई-लिलावाने देण्यास मंजुरी



धाराशिव। प्रतिनिधी

परंडा शहरातील दैनंदिन तसेच आठवडे बाजाराचा ठेका ई लिलावाने देण्याचा ठराव पालिकेच्या सर्वसाधारण सभेत बहुमताने घेण्यात आला.

नगरपरिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष झाकीर सौदागर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेस मुख्याधिकारी मनीषा वड्डेपल्ली, कार्यालय अधीक्षक जगदीश सोंडगे, मुनीर जिकरे यांच्यासह सत्ताधारी व विरोधी नगरसेवक उपस्थित होते. सभेत विविध विषयांवर चर्चा करून महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सभेच्या सुरुवातीला मागील सभेचे इतिवृत्त व विषय अहवाल वाचून कायम करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी नगरपरिषदेच्या विविध विभागांना आवश्यक असणाऱ्या साहित्य व सेवा पुरवठ्यासाठी निविदा मागविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. भांडार विभाग, पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग, लेखा विभाग तसेच इतर विभागांसाठी आवश्यक साहित्य खरेदी व सेवा पुरविण्यासाठी वार्षिक निविदा काढण्यास एकमताने मंजुरी देण्यात आली. या ठरावाचे सूचक रमेशसिंह परदेशी तर अनुमोदक सत्तार गुलाब खान पठाण होते. दरम्यान, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील दैनंदिन व आठवडी बाजाराच्या लिलावाचा विषय सभेसमोर आला. उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, नगरसेवक रमेशसिंह परदेशी, अनिल शिंदे व परवीन मन्नान बासले यांनी बाजाराचा लिलाव न करता नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांकडून कर वसुली करण्याची मागणी केली. मात्र, नगरपरिषदेकडे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने कर्मचाऱ्यांकडून वसुली करणे व्यवहार्य नसल्याचा अभिप्राय मुख्याधिकारी मनिषा वड्डेपल्ली यांनी मांडला. विरोधी नगरसेवकांनी ठेकेदारांकडून विक्रेत्यांची पिळवणूक होत असल्याची हरकत घेतली. त्यावर नगराध्यक्ष झाकीर सौदागर यांनी शासनाच्या संकेतस्थळावर जाहीर ई-लिलाव प्रसिद्ध करून नियमांनुसार ठेका देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट केले. या विषयावरील ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला. ठरावाचे सूचक चंद्रकांत नाना गायकवाड तर अनुमोदक मन्नाभी मतीन जिनेरी होते.तसेच महादेव दगडू ओव्हाळ यांना शासनाच्या निर्देशानुसार सेवानिवृत्ती वेतन व इतर लाभ देण्यास सभेत एकमताने मंजुरी देण्यात आली.

# अवैध वाळू उपसा करणाऱ्या संघटित टोळीवर धडाकेबाज कारवाई

## १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

जालना। प्रतिनिधी

आपेगाव व साष्टपिंपळगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीररित्या वाळूचे उत्खनन आणि चोरटी विक्री करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा महसूल विभागाने पर्दाफाश केला आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी विजय चव्हाण यांनी ही धडक कारवाई केली आहे. कारवाईची पार्श्वभूमी आणि घटना सराईत गुन्हेगार रात्रीच्या वेळी महसूल विभागाच्या गस्ती पथकावर पाळत ठेवून (लोकेशन घेऊन) गोदावरी पात्रातून मोठ्या प्रमाणात वाळूची चोरी करत आहेत. या माहितीची खात्री करण्यासाठी तलाठी सुनील उबरहंडे व दीपक गवारे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता, दि. ०२/०३/२०२६ ते ०४/०३/२०२६ या कालावधीत अंदाजे २५० ते ३०० ब्रास वाळूचे अवैध उत्खनन झाल्याचे निष्पन्न झाले.

संघटित गुन्हेगारी आणि दहशत: तपासात असे समोर आले आहे की, मंगेश माउली चौधरी उर्फ सोनू चौधरी याच्या पुढाकाराने ही संघटित टोळी कार्यरत होती. हे आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांनी परिसरात आपली दहशत निर्माण केली होती, ज्यामुळे स्थानिक नागरिक उघडपणे त्यांची नावे सांगण्यास धजावत नव्हते. विशेष म्हणजे, काही शेतकऱ्यांनी देखील वाळू चोरीसाठी आपल्या शेतातून रस्ता उपलब्ध करून देऊन या गुन्ह्यात सहभाग नोंदवला आहे. या चोरीमुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाला असून वाळूचे अंदाजित मूल्य ७,५०,५००/- रुपये इतके आहे.दाखल झालेले गुन्हे: मंडळ अधिकारी नारायण धनसिंग बमनावम यांच्या फिर्यादीवरून गोंदी पोलीस ठाण्यात एकूण १६ आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यामध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ६१(२), ३२९, ३३०, ४५, २२३ तसेच खाण आणि खनिज अधिनियम १९५७, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा १९८४ नुसार कारवाई करण्यात आली आहे.मुख्य आरोपींची नावे : मंगेश माउली चौधरी, एजाज हारून बेग, सुदर्शन अंकुश शेंद्रे, शहारूक आनवर शेख, राम मोरे, विलास खरात, समीर हारून बेग, आल्लमस सैयद, शाहीद हारून बेग, ज्ञानेश्वर उडदंगे, ज्ञानेश्वर बाबुराव शेंद्रे, रामेश्वर गौड, कृष्णा गोकुळ कट्टे, संजू उबरे, पांडुरंग जाधव आणि शरद नरके यांचा समावेश आहे.

# १५ हजारांचे अर्थसहायासाठी दिव्यांग लाभार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करा -मिन्नू



जालना। प्रतिनिधी

दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ आणि दिव्यांग धोरण २०१८ मधील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात दिव्यांगांना स्वावलंबी करण्यासाठी राज्य शासनाने पाऊल उचलले आहे. २८ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार, प्रशिक्षित दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी लागणारी साधनसामग्री (टूल किट) खरेदी करण्यासाठी १५ हजार रुपयांपर्यंतचे वित्तीय सहाय्य देण्यात येणार आहे. तरी पात्र लाभार्थ्यांनी या योजनेसाठी दिव्यांग सहायक पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले आहे.

सध्याच्या काळात नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे. शासकीय किंवा शासनमान्य प्रशिक्षण संस्थांमधून, तसेच कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. आपल्या कौशल्यानुसार स्थानिक पातळीवर लघुउद्योग किंवा सेवा व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारी उपकरणे खरेदी करण्यास यामुळे मदत होणार आहे. या योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने केली जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी दिव्यांग सहाय्यक या पोर्टलवर आपले अर्ज सादर करावेत. ऑफलाइन पद्धतीने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. प्राप्त अर्जांची छाननी जिल्हा कार्यालयामार्फत केली जाईल आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती पात्र लाभार्थ्यांची निवड करेल. असेही कळविण्यात येत आहे

# देवगिरी टेक्सटाईल मिलला मनपाचे सील



छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

महापालिकेने मार्चएण्डमुळे शहरात मालमत्ता कर वसुलीची धडक मोहीम सुरू केली आहे. यात १ लाखाहून अधिक कराची थकबाकी असलेल्या मालमत्तांना सील ठोकण्यात येत आहे. यात झोन क्रमांक ५ च्या पथकाने चिकलठाणा - एमआयडीसीतील देवगिरी टेक्सटाई मिल कंपनीला सील ठोकले. त्यांच्याकडे मालमत्ता करापोटी ३ कोटी ७ लाख रुपये थकले आहेत. याशिवाय झोन २, १० आणि ४ मधील पथकाने एमएसईबीच्या फ्यूज कॉल सेंटरसह विविध ठिकाणची पाच दुकाने सील केली आहेत.

महापालिका निवडणुकीनंतर कर मूल्य निर्धारक व संकलक विभागाचे उपायुक्त विकास नवाळे यांनी पुन्हा कर वसुलीच्या धडक मोहिमेला सुरुवात केली आहे. मार्चएण्डमुळे महिनाभरात किमान २०० कोटींची वसुली करून ४०० कोटींचे उद्दिष्ट गाठण्याकडे प्रशासनाने लक्ष केंद्रित केले आहे. या मोहिमेत झोन-५ कार्यालयांतर्गत एन-९ के सेक्टरमधील दुकान क्रमांक २२ चा १ लाख २४ हजार ९०६ रुपयांचा कर थकला होता. यासाठी पथकाने मालमत्ताधारक सांगोले यांचे दुकान सील करण्यात आले. तर याच झोन कार्यालयाअंतर्गत दुसर्या पथकाने चिकलठाणा एमआयडीसीतील देवगिरी टेक्सटाईल मिलकडे ३ कोटी ७ लाख २४ हजार २६ रुपयांचा कर थकल्याने कंपनीला सील ठोकण्यात आले. झोन क्रमांक २ मध्ये चौराह येथील मालमत्ताधारकाकडे १ लाख ११ हजार ५७ रुपयांचा कर थाकल्याने मालमत्ता सील केली. एन-१२ येथील राज हाईटमधील फ्यूज कॉल सेंटरकडे ५ लाख ६६ हजार आणि दुसऱ्या दुकानाचा ५ लाख ५८ हजार कर थकल्याने दोन्ही दुकाने सील केली. झोन क्रमांक १० मध्ये कांचनवाडीतील व्यावसायिक मालमत्ताचा ३६ लाख ७५ हजार रुपये कर थकल्याने तसेच या परिसरातील दुसर्या मालमत्ताधारकाकडे १ लाख १८ हजार कर थकल्याने सील करण्यात आल्या आहेत. या सातही मालमत्तांवर महापालिका अधिनियमाचे नियम ४२ च्या पोट कलम १ नुसार कारवाई करण्यात आली आहे.

# बस स्थानकात डिझेल भरताना एसटीला भीषण आग

लातूर। प्रतिनिधी

बस स्थानकात गुरूवारी सायंकाळी ८ वाजता डिझेल भरत असताना एसटी बसला अचानक भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. या आगीत डिझेल भरणारे ऑपरेटर बसवराज मठपती हे गंभीररित्या भाजले असून, आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेली बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे. सुदैवाने, अग्निशामक दलाने वेळेवर धाव घेतल्याने डिझेल पंपाचा मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, निलंगा बस स्थानकातील पंपावर एसटी बसमध्ये डिझेल भरण्याचे काम सुरू होते. यावेळी अचानक ठिणगी पडून आगीचा भडका उडाला. काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण केले. डिझेल भरणारे ऑपरेटर बसवराज मठपती हे आगीच्या विळख्यात सापडल्याने गंभीर भाजले आहेत. त्यांना तात्काळ निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच निलंगा नगरपालिकेचे नगरसेवक ईश्वर पाटील यांनी तात्काळ अग्निशामक दलाला पाचारण केले. घटनास्थळी डिझेलचा मोठा साठा असल्याने आग पसरली असती तर भीषण स्फोट होण्याची शक्यता होती. मात्र, अग्निशामक दलाच्या जवानांनी जीवाची बाजी लावून आगीवर नियंत्रण मिळवले आणि डिझेल टाकीपर्यंत आग पोहोचण्यापूर्वीच ती विझवली. या भीषण आगीत एसटी बसचा केवळ सांगाडा शिल्लक राहिला असून महामंडळाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आग लागल्याचे समजताच परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

# मानवत-पाथरी महामार्गावर उभ्या टिप्परला दुचाकीची धडक; तीन युवक जखमी

परभणी। प्रतिनिधी

मानवत-पाथरी राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या टिप्परला दुचाकी धडकून झालेल्या अपघातात तीन युवक जखमी झाले. ही घटना गुरुवारी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास तहसील कार्यालयाजवळ घडली.मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या टिप्परला कोणताही रिफ्लेक्टर किंवा इशारा दर्शवणारा इंडिकेटर नसल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. एमएच २४ एयू ७५६१ क्रमांकाचा टिप्पर बिघाड झाल्यामुळे रस्त्यालगत उभा करण्यात आला होता. प्रथमेश ज्ञानेश्वर केदारे, आकाश शिवाजीराव वांगीकर आणि पृथ्वीराज विश्वनाथ गायकवाड (सर्व रा. पाथरी) हे तिघे एमएच २२ बीजी १७१४ क्रमांकाच्या दुचाकीवरून मानवत येथील कॉलेज मैदानावर खेळून पाथरीकडे जात होते. अंधारामुळे रस्त्यावर उभा असलेला टिप्पर न दिसल्याने त्यांची दुचाकी थेट टिप्परच्या मागील बाजूस जाऊन धडकली. या अपघातात तिन्ही युवक जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. त्यापैकी प्रथमेश केदारे आणि पृथ्वीराज गायकवाड यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी परभणी येथे हलविण्यात आले आहे.

# डिजिटल अरेस्टचा काळा पैसा पांढरा करणारा गजाआड



छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

देशभरात धुमाकूळ घालत असलेल्या डिजिटल अरेस्ट आणि इतर सायबर गुन्ह्यांमधून लुटलेला काळा पैसा पांढरा करण्यासाठी चक्क विद्यार्थी आणि बेरोजगार तरुणांच्या नावावर बँक खात्याचा वापर करून लूट करणाऱ्या एका भामट्याला सायबर पोलिसांनी बेड्या ठोकल्या. लक्ष भरतलाल तलरेजा (२२, रा. कृष्णा रेसिडेन्सी, मित्रनगर) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याला न्यायालयाने १७ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावल्याची माहिती पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी दिली.

देशभरातील सायबर गुन्हेगारांच्या मोठ्या टोळीचा सक्रिय सदस्य असल्याचे तपासात समोर आले आहे. त्याच्या संशयास्पद कारनाम्यांमुळे यापूर्वी एटीएसनेही (दहशतवादविरोधी पथक) त्याला दोन वेळा उचलले होते. एक गुन्हाही एटीएसकडे दाखल आहे. फिर्यादी निखिल प्रकाश साळवे (रा. छत्रपती संभाजीनगर) यांच्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या खात्याचा गैरवापर करून १ जुलै ते १ सप्टेंबर २०२५ या काळात १२ लाख ५५ हजार रुपयांचे व्यवहार झाले होते. त्यांनी याप्रकरणी सायबर ठाण्यात तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा सखोल तांत्रिक तपास करत असतानाच हे मोठे रॅकेट पोलिसांच्या हाती लागले. यानंतर लक्ष तलरेजा याच्या मुसक्या आवळण्यात आल्या.

आरोपी तलरेजा पैशांचे आमिष दाखवून शहरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि बेरोजगार युवकांच्या नावाने बँक खाती उघडायचा. त्या बँक खात्यांचे पासबुक, एटीएम कार्ड, मोबाईल सिमकार्ड संपूर्ण किट तो स्वतःच्या ताब्यात ठेवायचा. देशभरातून सायबर फसवणुकीद्वारे उकळलेली रक्कम या खात्यांवर जमा व्हायची आणि आरोपी एटीएम किंवा चेकद्वारे ही रोख रक्कम तात्काळ काढून घ्यायचा. पोलिसांनी त्याच्याकडून अशा प्रकारच्या ५ तरुणांच्या किट जप्त केल्या. ही कारवाई पोलिस आयुक्त प्रवीण पवार, उपायुक्त (गुन्हे) रत्नाकर नवले यांच्या मार्गदर्शनात सायबर ठाण्याचे निरीक्षक सोमनाथ जाधव, सहाय्यक निरीक्षक कदिर देशमुख, उपनिरीक्षक गणेश गिरी अंमलदार योगेश तळवंदे, सुशांत शेळके, नितीन देशमुख, अमोल सोनटक्के, धनंजय सानप, गोकुळ कुत्तरवाडे, संदीप पाटील, राम काकडे, अल्ताफ पठाण, विजय काळवने, सोनाली भदाणे, क्षतिजा कीर्तन यांनी केली.या बँक खात्याविरुद्ध देशभरात ६५ तक्रारी : डिजिटल अरेस्टच्या नावाखाली उच्चशिक्षित आणि सामान्य नागरिकांना लाखो रुपयांचा गंडा घातला जात आहे. या गंभीर गुन्ह्यांमध्ये लोकांचे लुटलेले पैसे थेट तलरेजा याच्याकडे असलेल्या बँक खात्यांमध्ये वळते झाल्याचा पोलिसांना दाट संशय आहे. त्याच्याशी संबंधित बँक खात्यांमध्ये होत असलेल्या कोट्यवधींच्या संशयास्पद उलाढालीमुळे यापूर्वी एटीएसने त्याला दोन वेळा ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली होती. धक्कादायक बाब म्हणजे, सायबर गुन्ह्यांशी संबंधित या बँक खात्यांसंदर्भात देशभरातून तब्बल ६५ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

चेक, कारही जप्त : पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव यांच्यासह सहायक निरीक्षक कदिर देशमुख यांच्या पथकाने तलरेजा याच्या घराची शुक्रवारी झडती घेतली. यात काही बँक खात्यांचे पासबुक, चेकबुक, ३ ते ४ मोबाईल्स सापडले आहे. गुन्ह्यात वापरलेली कारही पोलिसांनी जप्त केली आहे.

# इस्त्रो सहलीसाठी नऊ तालुक्यांमधून तब्बल ९२ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

छत्रपती संभाजीनगर

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला (इस्त्रो) भेट देण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमधील निवडक विद्यार्थ्यांची सहल नेण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व नऊ तालुक्यांमधून निवडलेल्या ९२ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर चाचणी परीक्षा घेण्यात आली. यातून सुमारे तीस विद्यार्थ्यांची सहलीसाठी निवड करण्यात येणार आहे.

शहरातील बळीराम पाटील हायस्कूल येथे जिल्हास्तरीय अंतिम टप्प्याची परीक्षा घेण्यात आली. याआधी केंद्रस्तर व तालुकास्तर यामध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीलय अंतिम टप्प्यासाठी निवड करण्यात आली. ही परीक्षा ७५ गुणांची वस्तुनिष्ठ प्रश्न, २० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा आणि ५ गुणांची तोंडी परीक्षा अशी एकूण शंभर गुणांची होती.

ग्रामीण भागातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांमधे वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा व भविष्यातील शास्त्रीय दृष्टिकोनाची बीजे त्यांच्यामध्ये रुजली जावी याकरिता जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरचा शिक्षण विभाग दरवर्षी ही चाचणी आयोजित करण्यात येते. या माध्यमातून ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ही दुर्मिळ संधी उपलब्ध करून दिल्या जाते. जिल्हास्तरावर गुण-वत्ता यादीत आलेले विद्यार्थी हे विमानाद्वारे इसरो सेंटर येथे भेट देतील.

सदर इस्त्रो सहल निवड प्रक्रियेचे नियोजन आयोजन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित आणि जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण मार्गदर्शनाखाली करण्यात आले. झालेल्या जिल्हास्तरीय इस्त्रो निवड चाचणीचे संनियंत्रण शिक्षण विस्तार अधिकारी संगीता सावळे आणि मनीषा वाशिंबे यांनी केले.

बळीराम पाटील हायस्कूलचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच शहरातील शाळांमधील विज्ञान शिक्षक यांनी संपूर्ण परीक्षा प्रक्रियेची जबाबदारी पार पाडली.

cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र

रविवार दि.१५ मार्च २०२६ | ६

# शासनाच्या सर्व योजना प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत -विभागीय आयुक्त

**बीड । प्रतिनिधी**

**गावागावातील नागरिकांच्या समस्या त्वरित सोडविणे आणि शासनाच्या सर्व योजना थेट प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महसूल विभागासह विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना त्यांच्या गावातच मिळावा यासाठी राज्य शासनाने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' मंडळ स्तरावर आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. या शिबिरांचा प्रभावी वापर करून गावातील सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवाव्यात, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.**

बीड तालुक्यातील तळेगाव येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त पापळकर पुढे म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी वारंवार तहसील किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात येण्याची गरज भासू नये, यासाठीच मंडळ स्तरावर शिबिरे घेण्याची संकल्पना राबविण्यात येत आहे. या शिबिरांच्या माध्यमातून महसूल विभागाशी संबंधित विविध प्रश्नांसह शासनाच्या समाजोपयोगी योजनांची माहिती व लाभ नागरिकांना दिले जाणार आहेत. शेतकऱ्यांसाठी शेतपांदण रस्ते, बांधावरील मार्ग यासंदर्भात अनेकदा वाद-विवाद निर्माण होतात. अशा समस्या सोडवण्यासाठी राज्य शासनाने शेतपांदण रस्ते उपक्रम सुरू केला असून तो ३० मेपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश



त्यांनी प्रशासनाला दिले.

गावागावातील प्रश्न सोडवताना तलाठी, सरपंच आणि स्थानिक प्रतिष्ठित नागरिक यांच्या समन्वयातून उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. या शिबिरांमध्ये संजय गांधी निराधार योजना, वारसा हक्काचे फेरफार, जिवंत सातबारा, आयुष्मान भारत आरोग्य योजना यांसह विविध योजनांबाबत नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण केले जात आहे. गावातील प्रत्येकाने पक्षीय भेदभाव बाजूला ठेवून गावकऱ्यांच्या समस्या या शिबिरात मांडाव्यात आणि नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त पापळकर यांनी केले. प्रशासनातील अधिकारी अथवा कर्मचारी नागरिकांचे प्रश्न सोडवण्यात टाळाटाळ करत असतील तर नागरिकांनी थेट जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या शिबिरात प्रातिनिधिक स्वरूपात जातीचे प्रमाणपत्र, आयुष्मान भारत आरोग्य कार्ड, गरोदर मातांना आरोग्य किट यांसह विविध योजनांतील लाभांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, तळेगावचे सरपंच तसेच परिसरातील इतर गावांचे सरपंच आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

संघर्षाला मिळाला न्याय

पारधी समाजातील आप्पा भुजा पवार यांनी आपल्या कुटुंबाला हक्काचे घर मिळावे आणि मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी अनेक वर्षे सातत्याने संघर्ष केला. मात्र, दुर्दैवाने सन २०२३ मध्ये त्यांचे निधन झाले. या प्रकरणाची प्रशासनाने दखल घेत पवार कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी तळेवाडी येथे एक एकर जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात आली.

आज या संदर्भातील पुढील कार्यवाही छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते पार पडली.

या निर्णयामुळे संबंधित कुटुंबाला हक्काची जागा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून त्यांच्या पुनर्वसनाला मोठी मदत होणार आहे. आप्पा पवार यांनी आपल्या कुटुंबाच्या भविष्यासाठी केलेल्या संघर्षाला अखेर न्याय मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.





**बीड : मराठा भूषण, महाराष्ट्राचे तत्कालीन आरोग्य मंत्री तथा भूम-परंडा-वाशीचे आमदार तानाजीराव सावंत यांचा वाढदिवस बीडमध्ये अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला, त्यांना दीर्घायुष्य मिळण्याबरोबरच त्यांच्या मंत्रीपदासाठी पेंडगाव येथील मारुती मंदिरात महा अभिषेक करून महाप्रसाद वाटप करण्यात आला तसेच यावेळी दिव्यांग व्यक्तींना तीन चाकी सायकलिंगचेही वाटप करण्यात आले, यावेळी छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन, यांच्यासह छावा पदाधिकारी व मित्रपरिवार उपस्थित होता.**

# योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये कॅम्पस मुलाखती, ५० विद्यार्थ्यांना नोकरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये तृतीय वर्षात शिकणा-या विद्यार्थ्यांची अभ्यास क्रमातील शेवटचे सत्र संपण्यापूर्वीच कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड झाली असून या निवडीचे पालकवर्गातून समाधान व्यक्त होत आहे.



योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये पुणे येथील नामांकित सुंगवू हायटेक प्रायव्हेट लिमिटेड,लुकास टीव्ही,अद्विक हायटेक ह्या कंपन्याकरिता कॅम्पस मुलाखती नुकत्याच घेण्यात आल्या.यामध्ये तंत्रनिकेतनमधील तृतीय वर्षात शिकणा-या ऑटो मोबाईल, मॅकॅनिकल विभागातील एकूण ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली या कॅम्पस ◀◀ पान ३ वर

# काळ्या बाजारासाठी वापरण्यात येणारा गॅस सिलेंडरचा साठा केला जप्त

बीड । प्रतिनिधी

दिनांक १४ मार्च रोजी सहा. पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे यांनी पुरवठा अधिकारी प्रशांत एकनाथ सुपेकर यांना फोन वर माहीती दिली की, इमामपुर रोड शिवनेरीनगर येथे इसम नामे अजय मोहन घोडके याने त्याचे स्वतःचे घरामध्ये घरेलू वापरावचे गॅस व व्यवसायिक वापराचे गॅस टाक्याचा साठा करुन ठेवला आहे. असे कळविलेवरुन ते बार्शी नाका येथे आले. बार्शी नाका येथुन सपोनि उबाळे यांनी दोन पंच बोलावुन घेवुन मिळालेल्या



माहीतीच्या ठिकाणी जावुन निरीक्षण अधिकारी पुरवठा नेमणुक तहसील कार्यालय बीड यांचे सह व स्टाफ सह जावुन रात्री १.३० वाजता छापा मारला असता सदर छाप्यामध्ये अजय मोहनराव घोडके रा. शिवनेरीनगर इमामपुर रोड बीड याच्या ताब्यात घरगुती वापराच्या व व्यवसायिक वापराच्या इंडेन कंपनीच्या व एच.पी. कंपनीच्या अशा २९ गॅस टाक्या किंमती ७३७५० रुपये किंमतीच्या टाक्या अवैद्यरित्या साठा करुन ठेवलेला मिळुन आल्या. सदर आरोपी यास ताब्यात घेवुन पंचनामा करुन गॅस टाक्या ताब्यात घेवुन पोस्टेला आणुन त्याच्या विरुद्ध पोलीस ठाणे पेठ बीड येथे पुरवठा अधिकारी प्रशांत एकनाथ सुपेकर वय ३७ वर्षे व्यवसाय नौकरी पद निरीक्षण अधिकारी पुरवठा नेमणुक तहसील कार्यालय बीड यांनी फिर्याद दिल्यावरुन पोस्टेला गुरनं. ७८/२०२६ कलम २८७,२८८ भा.न्या.सं.२०२३ सह कलम ३,७ अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ ◀◀ पान ३ वर

# शेतकऱ्यांसाठी लाखोचा निधी पण आष्टी तालुक्यात माहिती देण्यास टाळाटाळ

## पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह

आष्टी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन आणि उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने कृषी विभागाकडून शेती शाळा हा उपक्रम राबवला जातो. मात्र आष्टी तालुक्यात या शेती शाळांबाबत माहिती मागूनही नागरिकांना व शेतकऱ्यांना माहिती मिळत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. तालुक्यात नेमक्या किती शेती शाळा सुरू आहेत,

त्या कोणत्या गावांमध्ये चालतात, त्यासाठी किती निधी मंजूर झाला आणि किती शेतकऱ्यांनी सहभाग घेतला याबाबत माहिती मागवूनही कृषी विभागाकडून स्पष्ट उत्तर देण्यात येत नसल्याचा आरोप होत आहे. माहिती देण्याऐवजी संबंधित टाळाटाळ केली जात अधिकाऱ्यांकडून असल्याने या योजनेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार विचारणा करूनही ठोस माहिती मिळत नसल्याने या शेती शाळा प्रत्यक्षात चालतात की फक्त कागदोपत्री दाखवल्या जातात? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी मोठ्या आहे. शासन प्रमाणात निधी खर्च करत असताना माहितीच लपवली जात असेल तर हा प्रकार गंभीर मानला जात आहे.

कृषी विभागामुळे आष्टी तालुक्यात कामकाजावर संशयाची सावली पडली असून या प्रकरणाची चौकशी

करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. शेतकरी संघटनांनी शेती शाळांची संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी आणि माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी गोर गरीब शेतकरी करु लागले आहेत.दरम्यान, या प्रकरणामुळे कृषी विभागाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून सत्य परिस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# येडेश्वरीचे सर्वाधिक गाळप,कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वीरित्या संपन्न

## ९.२२ लाख मेट्रिक टन ऊस गाळप; खा.बजरंग सोनवणे यांनी शेतकरी-कामगारांचे केले कौतूक

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील आनंदगाव येथील येडेश्वरी साखर कारखाना लि. (युनिट क्र.१) चा सन २०२५-२६ चा गळीत हंगाम मिल पूजन करून उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे यंदाचा गळीत हंगाम यशस्वीरीत्या



पूर्णत्वास गेला. बीड जिल्ह्यात सर्वाधिक उसाचे गाळप येडेश्वरी कारखान्याने केले आहे.

कारखान्याकडून यंदाच्या हंगामात एकूण ९,२२,११६.३७९ मेट्रिक टन ऊस गाळप करण्यात आले असून, ही कामगिरी कारखान्यासाठी निश्चितच अभिमानास्पद मानली जात आहे. संपूर्ण हंगामात ऊस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी शेतकरी आणि कारखाना ◀◀ पान ३ वर

# फुकटचे श्रेय घेऊ नका, बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली शहराचा विकास – खदीर बागवान यांचे पत्रक

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील बहाद्दर नागरीकांनी नगर परिषदेची सत्ता भाजपाचे नेते माजी मंत्री बदामराव पंडित आणि युवा नेते बाळराजे पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून दिली आहे. त्यामुळे, नवनिर्वाचित नगराध्यक्षांसह



सत्ताधारी नगरसेवक शहराच्या विकासात कुठेही कमी पडणार नाहीत. विकास कामांना सुरुवात झाली असून, विरोधी नगरसेवकांना फुकटचे क्षेय घेऊन, स्वतःचे हसे करून घेऊ नये, असा टोला खदिर बागवान यांनी लगावला आहे.

गेवराई नगर परिषदेचे विरोधी गटाच्या नगरसेवकांनी मुख्याधिकारी नप गेवराई यांना एका निवेदनाद्वारे शहरातील विकास कामाचे निवेदन दिले असून, ईदगाह मैदानाची साफसफाई, दारुल उलूम निजामिया रझाविया , संजय नगरच्या वार्ड समस्या निवेदनात नमूद करण्यात आल्यात. मात्र, केवळ ◀◀ पान ३ वर

# गायक राज रायते यांचा 'तेली समाज रत्न' पुरस्काराने गौरव

बीड । प्रतिनिधी

श्री संत संताजी जगनाडे महाराज तेली समाज जनसेवा बहुउद्देशीय संस्था (जामनेर, जि. जळगाव) यांच्या वतीने गायक राज प्रल्हादराव रायते यांना प्रतिष्ठेचा 'तेली समाज रत्न' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अजयजी चौधरी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.



संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित भक्तिगीतांमुळे गायक राज रायते यांनी आपल्या मधुर आवाजातून महाराष्ट्रासह देशभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

तेली समाजाचा अभिमान ठरणाऱ्या रायते यांना नुकतेच छत्रपती संभाजीनगर येथे 'तेली समाज भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्यानंतर जामनेर येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना 'तेली समाज रत्न' पुरस्कार जाहीर करून सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी त्यांच्या गायनाचा भव्य कार्यक्रमही मोठ्या उत्साहात पार पडला. संताजी जगनाडे महाराजांच्या अभंग आणि गीतांच्या माध्यमातून समाजकार्याचा संदेश पोहोचविण्याचे कार्य राज रायते करत आहेत. त्यांच्या ◀◀ पान ३ वर

# लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या योजना केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी

आष्टी । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याण महामंडळाची स्थापना होऊन चार वर्षे झाले आहेत या महामंडळाच्या वतीने ऊस तोडणी कामगारांसाठीच्या योजना आणि त्याची अंमलबजावणी अत्यंत मंद गतीने होत असून या योजना केवळ कागदोपत्री न राहता या योजना ऊस तोडणी कामगारांच्या जीवनाशी संबंधित आहेत शासनाचा शुद्ध हेतू हा ऊस तोडणी कामगारांच्या जीवनामध्ये परिवर्तन व्हावा असा असून या योजनांचा पात्र लाभार्थ्यांना फायदा व्हावा अशी आग्रही मागणी आमदार सुरेश धस यांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती दीपा



मुधोळ-मुंडे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली..

लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार नुकताच त्यांनी घेतला आहे

या महामंडळाची स्थापना सन २०२२ मध्ये होऊन या मंडळाच्या माध्यमातून ऊस तोडणी कामगारांची नोंदणी, ओळखपत्र, मुलांच्या शैक्षणिक सुविधा, वस्तीगृह, ऊस तोडणी कामगारांना अपघाती विमा,

## आ.सुरेश धस यांनी घेतली दीपा मुधोळ मुंडे यांची भेट

गळीत हंगाम कालावधीमध्ये कामगारांसह बैलांचा अपघात त्यानंतर मृत्यू झाल्यानंतर दिले जाणारे सानुग्रह अनुदान, तसेच ऊस तोडणी कामगार महिला भगिनींना आरोग्य विषयक सेवा सुविधा, गर्भधारणा कालावधीमध्ये त्यांना सकस आहार, गळीत हंगाम कालावधीमध्ये सेंट्रलाइज किचनच्या माध्यमातून मजुरांना बांधकाम कामगार यांच्या धर्तीवर सकाळी ताजा जेवणाचा डबा मिळावा.. अशा प्रकारच्या नावीन्यपूर्ण ◀◀ पान ३ वर

# परळी तालुक्यात १६ वर्षीय मुलीवर सामूहिक अत्याचार

## पालकांच्या तक्रारीनंतर पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल

### या प्रकरणातील दोन्ही आरोपी फरार असून पोलिस तपास सुरू

बीड । प्रतिनिधी

बीडच्या परळीमध्ये १६ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. परळी तालुक्यातील धारावती तांड्यावर सदर घटना घडली आहे. याप्रकरणी मुलींच्या पालकांनी दोघांविरोधात तक्रार दाखल केली असून त्यांच्याविरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपी फरार आहेत. याप्रकरणी पोलीस सखोल तपास करत आहेत. या घटनेने पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला दोन नराधमांनी आपल्या घरी लाडाने बोलावून घराचा दरवाजा बंद करून एकाने मुलीचे हातपाय बांधले, तोंडामध्ये कपड्याचा बोळा कोंबून ठेवला आणि तिच्यावर आळीपाळीने अतिशय निर्दयीपणे लैंगिक अत्याचार केले. तसेच कोणाला सांगितले तर तुला जीवे मारून टाकू असे धमकावून पीडित मुलीला सोडून दिले.

हा सर्व प्रकार त्या मुलीने घरी आल्यानंतर आपल्या आई-वडिलांना सांगितला. संतापलेल्या आई-वडिलांनी तातडीने परळी ग्रामीण पोलीस स्टेशन गाठून त्या दोन नराधमाविरोधात पोस्को अंतर्गत गु.र.न १२५/२०२६ कलम ६४,१२७(२),३५१(२),३५२,३(५), भारतीय न्याय संहिता सहकलम ४,१७, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ नुसार गुन्हा दाखल केला. यामधील दोन्ही आरोपी फरार झाले असून त्या नराधमांचा तपास उपविभाग अंबाजोगाई पिंक पथक आणि स.पो.नी संतोष जाधववर हे करत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
रविवार दि.१५ मार्च २०२६ । पान ७

# नवले पुलावर पुन्हा अपघात !

## भरधाव ट्रकने चिरडले; कोंढव्याच्या तरुणाचा जागीच मृत्यू, ५ वाहनांचा चक्काचूर

**पुणे । प्रतिनिधी**

नवले पूल परिसरात शुक्रवारी (दि. १३ मार्च) सकाळी पुन्हा भीषण अपघात घडला. कात्रज बोगद्याच्या दिशेने येणाऱ्या भरधाव ट्रकने सिग्नलला थांबलेल्या वाहनांना जोरदार धडक दिल्याने एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर पाच चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले. अशफाक हनिफ चौधरी( ३६ ,रा.कोंढवा) असे मृताचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी साडेसहाला नवले पुलाखालील चौकात सिग्नलमुळे वाहने थांबली होती.



याचवेळी कात्रज बोगद्याकडून उतारावरून वेगात येणाऱ्या ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. तीव्र उतारामुळे ट्रकचा वेग वाढला आणि त्याने सिग्नलवरील दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर ट्रकने पुढील पाच चारचाकी वाहनांना एकामागोमाग एक धडक दिली. या धडकेत वाहनांचा चक्काचूर झाला आहे. ट्रकच्या चाकाखाली दुचाकीस्वाराच्या मृतदेहाचे काही भाग अडकले होते. अपघातानंतर एकच गोंधळ उडाला. रस्त्यावर वाहनांचे अवशेष पडले होते. मोठी गर्दी झाल्याने वाहतूक विस्कळीत झाली. नऱ्हे, सिंहगड पलिसांनी घटनास्थळास भेट दिली. अपघातग्रस्त वाहने बाजूला काढल्यावर वाहतूक सुरळीत झाली. अपघातानंतर ट्रक चालक पसार झाल्याची माहिती नऱ्हे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आसाराम शेटे यांनी दिली.

अपघात टाळण्यासाठी हवा उन्नत पूल

नवले पूल- नवीन कात्रज बोगदा हा सात किलोमीटरचा तीव्र उताराचा पट्टा असल्याने येथे वारंवार गंभीर अपघात घडतात. अवजड वाहनांचा वेग नियंत्रणाबाहेर जाणे, ब्रेक निकामी होणे आणि वाहतुकीची मोठी गर्दी यामुळे येथे अनेकदा दुर्घटना घडतात.यापूर्वीही १३ नोव्हेंबर रोजी याच परिसरात कंटेनर चालकाचे नियंत्रण सुटल्याने १० ते १२ वाहनांना धडक बसून लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला होता.

प्रशासनाने वेगमर्यादा, चेतावणी फलक, वाहतूक नियंत्रणासारख्या उपाययोजना केल्या असल्या तरी अपघातांची मालिका थांबत नसल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.नवले पूल परिसरातील अपघात रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहे. नऱ्हे ते रावेत (सुतारवाडीमार्गे) दरम्यान उन्नत पुलाचा प्रकल्प मंजूर झाला असून या प्रकल्पामुळे मार्गावरील वाहतूक व अपघातांचा प्रश्न काही प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

## टेलिग्रामवर दहावी प्रश्नपत्रिका विक्री प्रकरणात तरुण अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

दहावीच्या प्रश्नपत्रिका मिळवून देण्याचे आमिष दाखवत पैशांसाठी विद्यार्थ्यांच्या भावनांशी डिजिटल खेळ करणाऱ्या १८ वर्षीय तरुणाला चंद्रपूरमधून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. पेपरफुटी झालीच नसून, हा 'डिजिटल' बनाव असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

दहावीच्या परीक्षेदरम्यान पेपर परीक्षा होण्यापूर्वीच एका टेलिग्राम ग्रुपवर उपलब्ध झाल्याची तक्रार पोलिसांकडे आली होती. या तक्रारीनुसार ९ मार्चचा पेपर चक्क ६ मार्चलाच ग्रुपवर दिसत असल्याचा दावा करण्यात आला होता. याप्रकरणी पुणे बोर्डाचे सहाय्यक अधीक्षक चंद्रकांत वैजनाथ जेवळीकर यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. तपासादरम्यान पोलिसांना आरोपीने प्रश्नपत्रिका मिळवून देण्याच्या नावाखाली पैसे उकळण्यासाठी वापरलेला 'क्यूआर कोड' मिळाला. हा कोड स्कॅन केल्यानंतर संबंधित तरुणाची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी 'फोनपे' कंपनी तसेच टेलिग्रामकडून तांत्रिक माहिती मिळवली. या तपासादरम्यान पोलिस अंमलदार तेजस चोपडे आणि गणेश जाधवर यांनी तांत्रिक तपास करून आरोपी चंद्रपूरमधील असल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर शिवाजीनगर पोलिसांनी तत्काळ एक पथक चंद्रपूरला रवाना करून १८ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले. परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त कृषिकेश रावले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार गणपत वालकोळी आणि अर्जुन कुडाळकर यांच्या पथकाने ही कारवाई केली. आरोपी टेलिग्राम ग्रुपवर आधी एक 'लॉक' केलेली पीडीएफ फाईल टाकून तोच बोर्डाचा मूळ पेपर असल्याचा बनाव करायचा. प्रत्यक्ष पेपर झाल्यानंतर टेलिग्राममधील 'एडिट' पर्यायाचा वापर करून त्या जुन्या फाईलच्या जागी झालेला खरा पेपर अपलोड केला जात असे. फाईल बदलली तरी टेलिग्रामवर तिची अपलोडिंग वेळ जुनीच राहत असल्याने विद्यार्थ्यांना पेपर आधीच 'लीक' झाल्याचा भास होत असे. या फाईलचा पासवर्ड देण्यासाठी आरोपी क्यूआर कोडद्वारे प्रत्येकी ६०० रुपयांची मागणी करायचा. पैसे मिळताच तो संबंधित विद्यार्थ्याला थेट 'ब्लॉक' करत असल्याचे तपासात उघड झाले आहे.

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ रुग्णालयात; २९ वर्षांपूर्वीच्या दुखापतीमुळे ऑपरेशनची वेळ, पैलवान खासदाराला महिनाभर सक्तीची विश्रांती

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर पुण्यातील एका खासगी रुग्णालयात आज यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. २९ वर्षांपूर्वी कुस्तीच्या आखाड्यात झालेली दुखापत बळावल्याने डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा सल्ला दिला होता. या शस्त्रक्रियेनंतर मोहोळ यांना आता किमान महिनाभर सक्तीची विश्रांती घ्यावी लागणार आहे.




मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या भावना व्यक्त करत सोशल मिडीयावर पोस्ट करत सांगितले की, २९ वर्षांपूर्वी कोल्हापूर येथे कुस्ती खेळत असताना त्यांच्या गुडघ्याला गंभीर दुखापत झाली होती. या दुखापतीमुळेच त्यांचे कुस्तीचे स्वप्न अधुरे राहिले आणि त्यांना कुस्ती सोडावी लागली. गेली अनेक वर्षे त्यांनी या त्रासाकडे दुर्लक्ष केले, परंतु अलीकडच्या काळात ही जुनी दुखापत पुन्हा उफाळून आली. सततचा प्रवास आणि धावपळीमुळे त्रास वाढल्याने अखेर डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. सध्या संसदेचे अधिवेशन सुरू असून, देशांतर्गत प्रवास आणि पुणे लोकसभा मतदारसंघातील नागरिकांच्या भेटीगाठी असे कामाचे मोठे नियोजन समोर आहे. तसेच आगामी 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेच्या तयारीचाही मोठा टप्पा आहे. शारीरिक त्रासापेक्षा या जनसेवेच्या कामात पडणाऱ्या खंडामुळे अधिक त्रास होत आहे, अशी भावुक प्रतिक्रिया मोहोळ यांनी सोशल मीडियाद्वारे दिली.शस्त्रक्रियेनंतर मोहोळ पुढील सात ते आठ दिवस रुग्णालयातच डॉक्टरांच्या देखरेखीखाली असतील. त्यानंतर त्यांना घरी विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तुमच्या शुभेच्छा आणि आशीर्वादाच्या जोरावर मी लवकरच बरा होऊन महिन्याभरात पुन्हा एकदा पहिल्यापेक्षा जास्त जोमाने जनसेवेसाठी हजर होईन, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुण्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरी मधील शास्त्रज्ञांची एलपीजी ला पर्यायी गॅसची निर्मिती

**पुणे । प्रतिनिधी**

अमेरिका-इस्रायल-इराण यांच्यात आज सलग १४ व्या दिवशी देखील युद्ध सुरु आहे. या युद्धाचा थेट फटका आता जागतिक अर्थव्यवस्थेला बसत असून युद्धामुळे जगभरात आणि विशेषतः भारतात एलपीजी गॅसची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. याचा फटका आता हॉटेल्स आणि कारखान्यांसोबतच शाळांसारख्या महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांनाही बसत आहे. एकीकडे एलपीजी (डझ्रऋ) गॅसच्या तुटवड्यामुळे संपूर्ण जग हैराण झालेलं असताना पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरी मधील शास्त्रज्ञांना एलपीजी (डझ्रऋ) ला पर्याय ठरू शकेल अशा डायमिथाईल इथर अ डीएमई (ऊ्वए) गॅसची निर्मिती करण्यात यश आलं आहे.



नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (छउड) मधील शास्त्रज्ञ डॉक्टर तिरुमलाईवामी राजा आणि त्यांच्या टीमने वीस वर्ष संशोधन करून हा गॅस तयार करण्यासाठी लागणारे उत्प्रेरक प्रयोगशाळेत तयार करण्यात यश मिळवलं आहे. या उत्प्रेरकापासुन तयार झालेल्या ऊ्वए गॅसचे व्यावसायिक वापरासाठी उत्पादन करण्यात देखील यश आलं असून सध्या पायलट प्रोजेक्टमधे दररोज अडीचशे किलोच्या प्रमाणात तो तयार होत आहे. औद्योगिक कंपन्यांसोबत करार करुन या गॅसच मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्यास हा गॅस डझ्रऋ मधे आठ टक्के इतक्या प्रमाणात मिसळता येणार आहे. त्यामुळे इंधनासाठी इतर देशांवर असलेलं अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे. मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्यास या गॅसची किंमत एलपीजी पेक्षा कमी असेल असा विश्वास शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे. एन सी एल मधील शास्त्रज्ञांनी हे संशोधन केलं आहे. डायमिथाईल इथर अर्थात डीई गॅस भारतीय बनावटीच्या उत्प्रेरकापासुन तयार करण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आहे. एलपीजी पेक्षा हा गॅस शुद्ध असल्याने या गॅसची फ्लेम पारदर्शक असते ज्यामुळे हा गॅस पर्यावरणपूरक ठरतो. हा गॅस स्वतंत्र देखील वापरता येतो आणि एलपीजी मधे आठ टक्के मिसळून देखील त्याचा वापर करता येतो. डीएमई गॅस मुळे एलपीजी वरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्यास या गॅसची किंमत एलपीजी पेक्षा कमी असेल.

## पुण्यातील कुख्यात टिपू पठाण टोळीवर मोक्का कारवाई; टिप्याच्या साथीदाराला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील गुन्हेगारी विश्वात दहशत निर्माण करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध पुणे पोलिसांनी आपली 'धडाकेबाज' मोहीम सुरूच ठेवली आहे. काळेपडळ पोलिसांनी कुख्यात गुन्हेगार रिझवान ऊर्फ टिपू सत्तार पठाण आणि त्याच्या सात साथीदारांवर तिसऱ्यांदा मोक्का (चउजउ-) अंतर्गत कारवाई केली आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांनी या टोळीतील एका फरारी साथीदारालाही बेड्या ठोकल्या आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टिपू पठाण आणि त्याची टोळी काळेपडळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत हॉटेल चालक आणि मटण दुकानदारांना लक्ष्य करत होती. ही टोळी दुकानदारांकडे जाऊन मी सांगेन त्याच दुकानातून मटण खरेदी करायचे अशी सक्ती करत असे. तसेच, हॉटेल व्यवसाय सुरळीत चालू ठेवायचा असेल, तर दरमहा ५ हजार रुपये खंडणी द्यावी लागेल, अशी धमकी दिली जात होती. पैसे न देणाऱ्यांना जीवे मारण्याची भीती दाखवून ही टोळी दहशत माजवत होती. सय्यदनगरमधील ख्यॉजा मंजिल येथील आपल्या कार्यालयात एका हॉटेल मालकाला बोलावून, टिपू पठाणने त्याला स्वतःच्या भागीदारीतील मटण दुकानातून खरेदी करण्यासाठी दबाव टाकला आणि खंडणीची मागणी केली. या त्रासाला कंटाळून दुकानदारांनी काळेपडळ पोलिसांकडे धाव घेतली आणि तक्रार नोंदवली. या तक्रारीनंतर १६ फेब्रुवारी २०२६ रोजी टोळीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. टिपू पठाण आणि त्याच्या टोळीवर यापूर्वी दोन वेळा जागा बळकावून खंडणी उकळल्याप्रकरणी मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. मात्र, तांत्रिक कारणांमुळे (वेळेत दोषारोपपत्र दाखल न झाल्याने) त्यांना जामीन मिळाला होता. जामिनावर बाहेर येताच या टोळीने पुन्हा गुन्हेगारी कृत्य सुरू केले. याची गंभीर दखल घेत पुणे पोलीस आयुक्तांनी या टोळीवर तिसऱ्यांदा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) लावला आहे. या गुन्ह्यात गेल्या काही दिवसांपासून फरारी असलेला टिपूचा साथीदार फैजान ऊर्फ पच्चीस रमजान ऊर्फ कादर शेख (वय २१, रा. सय्यदनगर) याला काळेपडळ पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. टोळीतील इतर सदस्यांचा शोध सुरू असून, या कारवाईमुळे खंडणीखोर गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

## चिमुकलीचा हात लिफ्टच्या दरवाजाच्या सापटीत अडकला

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

लिफ्टचा वापर करताना लहान मुलांच्या सुरक्षिततेबाबत गाफील राहणे किती धोकादायक ठरू शकते, याचा प्रत्यय पिंपरी-चिंचवडमधील दिघी परिसरात आला आहे. एका गृहनिर्माण सोसायटीत लिफ्टच्या दरवाजाच्या सापटीत चिमुकलीचा हात अडकल्याची थरारक घटना घडली. सुदैवाने, काही मिनिटांच्या प्रयत्नांनंतर हात सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.




दिघीतील एका सोसायटीत ही घटना घडली. एक महिला आपल्या काही महिन्यांच्या चिमुकलीसह लिफ्टमधून जात होती. लिफ्ट इच्छित मजल्यावर थांबल्यानंतर दरवाजा उघडला आणि पुन्हा बंद होऊ लागला. यावेळी चिमुकलीने सहज आपला हात दरवाजावर ठेवला होता, जो दरवाजा बंद होताना सापटीत अडकला.

हा प्रकार लक्षात येताच लिफ्टमधील महिलेसह उपस्थित नागरिक भयभीत झाले. चिमुकली वेदनेने रडत असतानाच तिला वाचवण्यासाठी तात्काळ प्रयत्न सुरू झाले. काही मिनिटांच्या धडपडीनंतर तिचा हात बाहेर काढण्यात आला आणि मोठा अनर्थ टळला. या घटनेचा सर्व प्रकार सोसायटीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, सध्या हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या घटनेमुळे लिफ्ट वापरताना विशेषतः लहान मुलांबाबत कमालीची सतर्कता बाळगण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## स्वारगेट चौकात दोन दिवसांत ३७५ बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट चौकातील बेशिस्त वाहतूक आणि अवैध रिक्षा थांब्यांमुळे होणारी कोंडी फोडण्यासाठी वाहतूक शाखेने धडक मोहीम हाती घेतली आहे. गेल्या दोन दिवसांत स्वारगेट वाहतूक विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) केलेल्या संयुक्त कारवाईत तब्बल ३७५ रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, १० सदोष रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. या धडक मोहिमेमुळे गेल्या काही दिवसांपासून वाहतुकीच्या विळख्यात अडकलेल्या स्वारगेट चौकाने मोकळा श्वास घेतला आहे.



स्वारगेट हा पुण्याचा मुख्य वाहतूक हब असून, येथे एसटी स्थानक, पीएमपी स्थानक आणि मेट्रोमुळे प्रवाशांची मोठी वर्दळ असते. मात्र, 'नो पार्किंग' आणि 'नो हॉल्टिंग' झोनमध्ये रिक्षांच्या रांगा, जादा प्रवासी भरणे आणि रस्त्याच्या मध्यभागी वाहने उभी करण्याच्या प्रकारांमुळे येथे दिवसभर गोंधळ उडत होता. या पार्श्वभूमीवर, वाहतूक शाखेचे उपायुक्त हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्वारगेट विभागाच्या सहायक पोलीस निरीक्षक शोभा क्षीरसागर आणि त्यांच्या पथकाने जेधे चौक, बस स्थानकाचे प्रवेशद्वार (इनगेट/आउटगेट) आणि महामेट्रो परिसराची नाकेबंदी करून ही विशेष मोहीम राबवली.या मोहिमेदरम्यान १० मार्च रोजी वाहतूक विभागाने एकट्या स्वारगेट परिसरात १४६ रिक्षांवर कारवाई केली. यामध्ये प्रामुख्याने जादा प्रवासी १११, भाडे नाकारणाऱ्या ३२ वाहनावर कारवाई केली. तर, ३ सदोष रिक्षा जप्त करण्यात आल्या. त्यानंतर १२ मार्च रोजी वाहतूक पोलीस आणि आरटीओ पुणे यांनी संयुक्तरीत्या कारवाईचा वेग वाढवला. या दिवशी १८६ केसेस वाहतूक विभागाने, तर ४३ केसेस आरटीओने नोंदवल्या. यामध्ये युनिफॉर्म नसणे ४८, वाहतुकीस अडथळा निर्माण करणे १८, भाडे नाकारणे २१ आणि ९२ जणांवर जादा प्रवासी भरल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली. दोन दिवसांच्या या मोहिमेत एकूण १० रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत.

## अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठात 'उत्कर्ष' राष्ट्रीय परिषद संपन्न; ४८ संशोधन शोधनिबंधांचे सादरीकरण

**पुणे । प्रतिनिधी**

अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठातील डॉ. डीवाय पाटील स्कूल ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने 'उत्कर्ष - अत्याधुनिक संशोधन आणि नवोपक्रम' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद नुकतीच संपन्न झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहयोगाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती.



विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. अजिंक्य डीवाय पाटील आणि स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे संचालक व उपाध्यक्ष प्रा. डॉ. एकनाथ बी. खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद पार पडली.

उद्घाटन सोहळ्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे (छत्रपती संभाजीनगर) प्र-कुलगुरू प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे आणि लँगबस्टेक युनिव्हर्सिटी इंक., न्यू जर्सी (अमेरिका) चे अध्यक्ष व कुलपती प्रा. डॉ. रिपू रंजन सिन्हा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. डॉ. पराग काळकर यांनी डिजिटल युगातील संशोधनाने केवळ सैद्धांतिक चौकटींपुरते मर्यादित न राहता, सामाजिक, औद्योगिक आणि तांत्रिक आव्हानांवर थेट उपाय शोधण्यासाठी डेटा-आधारित अंतर्दृष्टी आणि डिजिटल साधनांचा वापर करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे यांनी विद्यापीठे आणि उद्योगांमधील भागीदारी नवोपक्रमाला चालना देण्यासाठी महत्त्वाची असल्याचे नमूद केले. अशा सहकार्यातून विद्यार्थ्यांना वास्तविक जगातील आव्हाने अनुभवता येतात आणि रोजगाराच्या चांगल्या संधी निर्माण होतात, असेही ते म्हणाले.

प्रा. डॉ. एकनाथ खेडकर यांनी स्वागत करताना डिजिटल युगात संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञांनी सर्जनशील व दूरगामी विचारसरणी अंगीकारण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले. परिषदेत संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञांनी एकूण ४८ संशोधन शोधनिबंध सादर केले. परिषद यशस्वी करण्यासाठी निमंत्रक डॉ. गणेश लांडे, डॉ. आशुतोष खेडकर, डॉ. सुमित बनकर, डॉ. चेतन सरवदे आणि डॉ. चेतन खेडकर यांनी विशेष परिश्रम घेतले. समारोपप्रसंगी डॉ. गणेश लांडे यांनी आभार मानले.देशभरातील तज्ज्ञांचा सहभाग

परिषदेत देशभरातील अनेक विद्यापीठांचे कुलगुरू व तज्ज्ञ सहभागी झाले. यात बाबू बनारसी दास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सतीश शर्मा, एनएसबी बंगलोरचे श्याम शुक्ला, पंजाब पतियाला विद्यापीठाचे डॉ. राजविंदर सिंग, महर्षी दयानंद विद्यापीठाचे डॉ. दलबीर कौशिक, डॉ. चिन्नप्पा (हैदराबाद), डॉ. उमेश राव, गोव्याच्या सेंट झेवियर्स महाविद्यालयाचे डॉ. फिलिप रोड्रीग्ज ई मेलो, पुणे विद्यापीठातील डॉ. धनंजय मंडलिक, डॉ. विनोद मालकर, डॉ. भारत कासार तसेच लँगबस्टेक युनिव्हर्सिटीचे प्र-कुलगुरू डॉ. कुलदीप चरक यांनी मार्गदर्शन केले.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत नगरसेवकांची नियुक्ती विलंबित; १५ एप्रिलला होऊ शकते मंजुरी

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीचा विषय मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. मात्र, भाजपच्या सात जणांचे अर्ज भरले नसल्याने भाजप नगरसेवकांनी आयुक्तांकडे मुदतवाढ देण्याची विनंती केली होती. दरम्यान, मंजुरीसाठी ठेवण्यात आलेल्या यादीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजेंद्र जगताप, सीमा साळवे, फजल शेख या तीन स्वीकृत नगरसेवकांचा नावाचा समावेश होता.

मात्र, नियुक्तीचा विषय तहकूब करण्यात आला आहे. आता या निवडी १५ एप्रिलच्या सर्वसाधारण सभेत होण्याची शक्यता आहे. विषय तहकूब केल्याने स्वीकृत नगरसेवकांचा महिनाभराचा कालावधी वाया गेल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच, डीपी सुनावणी समितीवर सदस्य म्हणून स्थायी समितीच्या तीन सदस्यांची निवड करण्याचा विषयही तहकूब करण्यात आला. त्या विषयावर सभागृहाने अनेक ठिकाणचे आरक्षणे रद्द करण्याची मागणी केली. चऱ्होली येथील जकात नाक्याची ६ हजार ५०० चौरस मीटर जागा



ताब्यात घेण्याचा विषयावर चर्चा करताना सुलभा उबाळे यांनी जकात नाके बंद केले. मात्र, जागेचा विकासच केला नाही. ती जागा मालकाला परत द्यावी, अशी मागणी केली. संदीप वाघेरे यांनी खासगी जागा दिल्यानंतरही महापालिकेने विकास केला नाही. टीडीआर दिला; पण प्रत्यक्ष काम शून्य, असा आरोप केला. प्रशांत शितोळे, नितीन काळजे, संजय काटे, तुषार हिंगे, वैशाली काळभोर आदींनीही संपूर्ण माहिती देण्याची मागणी केली. नगररचना विभागाने जागांची स्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी वैशाली काळभोर यांनी केली.

त्यावर नगर रचना विभागाचे उपसंचालक किशोर गोखले यांनी खुलासा करताना सांगितले, की १०,५०० चौरस मीटर जागेचा संदर्भ देत तापकीर यांची सुमारे ६,५०० चौरस मीटर जमीन असल्याचे सांगितले. दोन वर्षांत ताबा घेण्याची प्रक्रिया असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी उपसूचना देत शहरातील कलाकारांसाठी जागा द्यावी. नाट्य संकुलासाठी ३० ते ३५ कोटींचा खर्च अपेक्षित आहे, अशी उपसूचना दिली. उपसूचनेसह महापौरांनी त्या विषयाला मंजुरी दिली.